
गुरुवार, २६ मे २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३०८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अरबी समुद्रात रेंगाळलेला मान्सून अखेर पुढे सरकला



**मुंबई :** गेले काही दिवस अरबी समुद्रात रेंगाळलेला मान्सून पुढे सरकला आहे. मान्सूनच्या पुढच्या वाटचालीसाठी अनुकूल स्थिती निर्माण झाल्याने अरबी समुद्राचा आग्नेय आणि नैऋत्य भाग मान्सूनने व्यापला आहे तसेच दक्षिण आणि ईशान्य बंगालच्या उपसागराच्या काही भागातही मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. मान्सूनचा हा प्रवास असाच सुरू राहिला, तर पुढील आठवडाभरात मान्सून राज्याच्या वेशीवर पोहचेल अशी अपेक्षा आहे. दरम्यान, मान्सूनची आगेकूच पुन्हा सुरू झालेली असताना हवामान विभागाने पुढील चार दिवस मुंबईसह कोकण, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा इशारा दिला आहे. पश्चिमेकडे निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र आणि बंगालच्या उपसागरातील चक्रीय स्थितीमुळे देशातल्या बहुतेक राज्यात मान्सूनपूर्व सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

अंतरंग

आंबे खरेदी करताना सावधान! होतेय फसवणूक/३

माणगावमध्ये घरफोडींचे सत्र सुरूच; सतर्कतेचे आवाहन/५

सुभाष पुजारींची शरीरसौष्ठव स्पर्धांसाठी निवड/८

# रायगडात शिवसेनेचे एकला चलो रे!

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी स्वबळाची तयारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य सरकारमध्ये शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस हे तीन पक्ष महाविकास आघाडीत एकत्र असले तरी रायगड जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेने स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. तसे स्पष्ट संकेत शिवसेनेच्या शिवसंपर्क अभियानातून मिळाले आहेत.



शिवसेनेच्या शिवसंपर्क अभियानाला रायगड जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. उरण, कर्जत पाठोपाठ मंगळवारी (दि. २४) अलिबाग आणि पेण मतदारसंघात शिवसंपर्क अभियान मेळावे घेण्यात आले. खासदार राजन विचारे आणि संपर्कप्रमुख दीपक चावरी यांनी पदाधिकाऱ्यांशी आणि कार्यकर्त्यांशी या निमित्ताने संवाद साधला. या वेळी सर्व वक्त्यांनी आगामी निवडणुकीत स्वबळाच्या तयारीला लागण्याचे निर्देश कार्यकर्त्यांना दिले.

जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगरपालिकांच्या निवडणुका आगामी काळात होणार आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये आघाडी करायची किंवा नाही याचा निर्णय पक्षप्रमुख मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घेतील, पण तुम्ही स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी ठेवा, असे खासदार राजन विचारे या वेळी म्हणाले.




गेली अनेक वर्षे शिवसेना जिल्हा परिषदेत सत्तेपासून दूर राहिली आहे, पण आता शिवसेनेची सत्ता जिल्हा परिषदेवर आणायची आहे, असे जिल्हाप्रमुख आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटले.

पक्षांतर्गत मतभेद बाजूला ठेवा. ज्यांना पक्षासाठी वेळ देता येत नाही. त्यांनी पद सोडून नवीन कार्यकर्त्यांना द्या, अशी सूचना शिवसेनेचे संपर्कप्रमुख दीपक चावरी यांनी केली. या वेळी जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, कामगार नेते दीपक रानवडे, अलिबाग तालुकाप्रमुख राजा केणी आदी उपस्थित होते.

### महाविकास आघाडीत 'ऑल इज नॉट वेल'

शिवसेनेने स्वबळाचे दंड थोपटल्याने रायगड जिल्ह्यातील महाविकास आघाडीत सारेकाही आलबेल नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. राज्यातील सरकारमध्ये एकत्र असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये रायगडात पहिल्यापासूनच संघर्ष दिसून आलेला आहे. मध्यंतरी तर शिवसेनेने पालकमंत्री हटाव भूमिका घेत दंड थोपटले होते. जिल्ह्यात काँग्रेसचे अस्तित्व नगण्य आहे. त्यामुळे शिवसेनेने स्वबळाचा नारा देत राष्ट्रवादीला आव्हान दिल्याची चर्चा आहे.

## राज्यात ओबीसी समाजावर अन्याय होतोय

### काँग्रेसचा घरचा आहेर; प्रदेशाध्यक्षांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसी समाजावर सातत्याने अन्याय होत आहे. राजकीय आरक्षण असो आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मुद्दे असो महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात बहुजनांवर होणारा अन्याय योग्य नाही. राज्याचे प्रमुख या नात्याने आपण या समाजाच्या सर्व समस्यांची गंभीर दखल घेऊन न्याय द्यावा, असे पत्र प्रदेश काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या निवेदनासह काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवले आहे. हे पत्र म्हणजे महाविकास आघाडीतील काँग्रेसने दिलेला



घरचा आहेर असल्याचे म्हटले जात आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, महाराष्ट्र महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येऊन अडीच वर्ष झाली तरी ओबीसींचे राजकीय आरक्षण हा प्रश्न अजून कायमच आहे. मध्यंतरी ओबीसी आरक्षणाशिवायच जिल्हा परिषद, नगरपालिका निवडणुका झाल्या हा या समाजावर अन्यायच आहे.

ओबीसी मुला-मुलींसाठी ७२ वसतिगृहे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता, मात्र त्याची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचाही प्रश्न आहे, शासकीय नोकरभरती बंद असल्याने हा समाज नोकरीपासून वंचित राहिलेला आहे. यासह सर्व समस्यांची दखल घेऊन तातडीने सोडवाव्यात, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी मुख्यमंत्री ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

### यासिन मलिकला जन्मठेपेची शिक्षा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दहशतवाद्यांना पैसा पुरवल्याप्रकरणी पटियाला हाऊस न्यायालयाने आरोपी काश्मीर फुटीरतावादी नेता यासिन मलिकला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) कोर्टाकडे मलिकला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. मलिकनेही आरोप कबूल केले होते. त्यानंतर कोर्टाने मलिकला जन्मठेप सुनावली आहे.

## देवकान्हेतील असंख्य ग्रामस्थ आज करणार भाजपमध्ये प्रवेश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील देवकान्हे येथील असंख्य ग्रामस्थ भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. देवकान्हे येथे गुरुवारी (दि. २६) सायंकाळी ५ वाजता हा पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी मंत्री तथा पेण मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील आणि भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष महेश मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे. या सोहळ्यास जिल्ह्यातील भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

### निवडक

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कपिल सिब्बल यांचा राजीनामा**

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कपिल सिब्बल यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. यानंतर त्यांनी राज्यसभा निवडणुकीसाठी समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यावर उत्तर प्रदेशातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला आहे. त्यांचा अर्ज भरताना सपचे प्रमुख अखिलेश यादव व इतर नेते उपस्थित होते. या वेळी सिब्बल यांनी आपण १६ मे रोजीच काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला असल्याचे सांगितले.

**मुंबईत दुचाकीवर मागे बसलेल्या व्यक्तीलाही हेल्मेट बंधनकारक**

**मुंबई :** मुंबईमध्ये दुचाकीस्वार आणि मागे बसलेल्या व्यक्तीसाठीही हेल्मेटसक्ती करण्यात आलेली आहे. १५ दिवसानंतर याची अंमलबजावणी होणार असून नियमाचे पालन न केल्यास ५०० रुपये दंड आणि तीन महिन्यांसाठी लायसन्स निलंबित करण्याची कारवाई केली जाणार आहे. यासंबंधी पोलिसांनी परिपत्रक जारी केले आहे.

## सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला आजपासून पर्यटकांसाठी बंद

### पावसाळी वातावरणामुळे पुरातत्त्व विभागाचा निर्णय

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाळा जवळ आल्याने समुद्रात उसळणाऱ्या मोठ्या लाटांच्या पार्श्वभूमीवर मुरूडजवळील राजपुरी येथील सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला गुरुवार (दि. २६)पासून पर्यटकांना बंद ठेवण्यात येणार आहे. पुरातत्त्व विभागाने तशी घोषणा केली आहे.

जंजिरा किल्ला पाहण्यासाठी राजपुरी येथून बोटीने जावे लागते. पावसाळा जवळ आल्याने समुद्रातील लाटांचे प्रमाण वाढले आहे. या लाटा किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशीही धडकत आहेत. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पावसाळी हंगाम संपेपर्यंत किल्ला बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती पुरातत्त्व विभागाचे अधिकारी बजरंग ऐलीकर यांनी दिली.



## राज्यात पेट्रोलवर केंद्राच्या करापेक्षा १० रुपये जास्त कर

### पनवेलमध्ये भाजपचे मविआ सरकारविरोधात आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यात पेट्रोलवर केंद्राच्या करापेक्षा राज्याचा कर १० रुपये जास्त असताना महागाई कोणामुळे आहे हे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितले पाहिजे, असे आव्हान बुधवारी (दि. २५) भाजपच्या वतीने आयोजित आंदोलनातून देण्यात आले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून जनतेला मोठा दिलासा दिला आणि त्या अनुषंगाने इतर राज्यांनीही कर कमी केला, मात्र महाराष्ट्रातील ठाकरे सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. त्यामुळे इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकारनेही अंमलबजावणी करावी यासाठी आंदोलन करण्यात आले.



भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली तालुका व शहर भाजप कार्यालयाजवळ झालेल्या आंदोलनात जि. प. सदस्य अमित जाधव, शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष के. सी. पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते बी. के. ठाकूर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, चिन्मय समेळ, राजेश पाटील, प्रवीण म्हात्रे, महेंद्र भोईर, गुरूनाथ भोईर, किर्ती पाटील, संदेश पाटील, आकाश भाटी, संतोष शेळके यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

महाराष्ट्रात पेट्रोलवर केंद्र सरकारचा कर १९ रुपये प्रतिलिटर, तर राज्याचा कर २९ रुपये आहे. केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेलवरील कर कमी केल्यामुळे किमतीत कपात झाली. परिणामी राज्यातील करामुळे मिळणारी रक्कमही आपोआप कमी झाली. हा दर आपणच कमी केल्याचा गवगवा करून महाविकास आघाडी जनतेची दिशाभूल करीत आहे. आघाडीतील नेते महागाईवर बोलत असतात, पण आता राज्यात पेट्रोलवर केंद्राच्या करापेक्षा राज्याचा कर १० रुपये जास्त असताना महागाई कोणामुळे आहे हे या नेत्यांना सांगता येत नसून राज्यातील पेट्रोल-डिझेलची इंधनवाढ केवळ महाविकास आघाडी सरकारमुळे आहे हे स्पष्ट झालेय.

देशातील अनेक राज्यांनी केंद्राप्रमाणे करकपात केली आहे, मात्र महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार नेहमीप्रमाणे टोमणे शैलीत गुरफटले आहे. त्यामुळे या निष्क्रिय सरकारला जागे करण्यासाठी पुन्हा एकदा आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला.

# पनवेलचा छत्रपती शिवाजी महाराज चौक इलेक्ट्रिक केबलच्या जाळ्यातून झाला मुक्त

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेलचा छत्रपती शिवाजी महाराज चौक इलेक्ट्रिक केबलच्या जाळ्यातून मुक्त करण्यात आला आहे. महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्या ठिकाणी भूमिगत वायरिंग करण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे तेथे भूमिगत वायरिंग झाल्याने या चौकाच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे. त्यामुळे अनेक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

पनवेल शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ महापालिकेने शिवसृष्टी साकारून मावळे आणि झूल घातलेल्या हत्तींची शिल्पे बसवल्याने येथील सौंदर्य खुलले आहे. पनवेलकर ही शिल्पे पाहण्यासाठी आणि त्यांचे फोटो


(छाया : लक्ष्मण ठाकूर)

काढण्यासाठी त्या ठिकाणी गर्दी करीत असतात, पण तेथील आजूबाजूच्या खांबावरील इलेक्ट्रिकच्या केबलच्या जाळ्यामुळे हा परिसर विद्रूप दिसत असे. फोटोमध्येही त्या केबल्स दिसत असल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्या ठिकाणी भूमिगत वायरिंग करण्याची मागणी केली होती.

सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सुचनेनुसार महापालिकेने त्या ठिकाणी हायमास्टसाठी असलेल्या इलेक्ट्रिक खांबावरील केबल व आजूबाजूच्या खांबावरील केबल भूमिगत करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचे काम पूर्ण झाल्याने आता हा परिसर स्वच्छ व सुंदर दिसत आहे. याबद्दल अनेकांनी सभागृह नेते परेश ठाकूर यांची भेट घेऊन आभार मानले.

> **कोकणचे प्रवेशद्वार असलेल्या पनवेल शहरात महापालिकेने छत्रपती शिवाजी महाराजांचे बनवलेले स्मारक पाहून मनाला समाधान मिळते. त्या ठिकाणी असलेले इलेक्ट्रिक केबलचे जाळे काढल्यामुळे या चौकाच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे. यासाठी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.**
> **-वैशाली पाटील, शिक्षिका**

## अमृत योजनेंतर्गत कामांचा आढावा

### महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून अधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात अमृत योजनेंतर्गत विविध कामे सुरू आहेत, मात्र सद्यस्थितीत ही कामे संथगतीने सुरू आहेत. त्या पार्श्वभूमीवर महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी (दि. २५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भोकरपाडा आणि वयाळ येथील प्लांटला भेट देऊन कामाचा आढावा घेतला तसेच या कामाला गती देण्याची सूचना अधिकाऱ्यांना केल्या.



पनवेल महापालिका हद्दीतील गावांना व शहरांना मुबलक पाणी मिळावे याकरिता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याने पनवेल महापालिकेला अमृत योजना मंजूर झाली आहे. केंद्र शासन पुरस्कृत असलेल्या या योजनेनुसार महापालिका हद्दीतील २९ महसूल गावांत एकूण ४० पाण्याच्या टाक्या बांधण्यात येणार आहेत. व त्यासोबत गावांमध्ये अंतर्गत एकूण १६५ किलोमीटर नवीन पाईपलाईनची जोडणी करण्यात येणार आहे, मात्र सद्यस्थितीत अमृत योजनेचे काम संथगतीने सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भोकरपाडा आणि वयाळ येथील प्लांटची अधिकाऱ्यांसह पाहणी करून कामासंदर्भात चर्चा केली व कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या.

या वेळी नगरसेवक अनिल भगत, एमजेपीचे कार्यकारी अभियंता विजय सुर्यवंशी, उपअभियंता के. बी. पाटील, महापालिका पाणीपुरवठा अधिकारी विलास चव्हाण व अन्य अधिकारी उपस्थित होते.

# आघाडी सरकारकडून ओबीसींची फसवणूक

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा आरोप; मुंबईत धडक मोर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा मिळविण्यासाठी भाजपने बुधवारी मुंबईत मंत्रालयावर धडक मोर्चा काढला. महाविकास आघाडी सरकार ओबीसींची फसवणूक करत असल्याचा आरोप यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केला.



प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजी प्रदेशाध्यक्ष व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी मंत्री गिरीश महाजन, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, प्रदेश उपाध्यक्ष माजी मंत्री राम शिंदे, प्रदेश सरचिटणीस आ. देवयानी फरांदे, सरचिटणीस आ. अतुल सावे, खासदार प्रीतम मुंडे, आ. गोपीचंद पडळकर, आ. राम सातपुते, आ. मनिषा चौधरी, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यावेळी उपस्थित होते.

प्रदेश कार्यालयातून मंत्रालयाकडे निघालेल्या मोर्चाला पोलिसांनी अडविले. यावेळी कार्यकर्त्यांनी आघाडी सरकारच्या विरोधात तसेच ओबीसींना परत राजकीय आरक्षण देण्याच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, महाविकास आघाडीच्या नाकर्त्या सरकारने राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण गमावले. ते या विषयाचा अभ्यास करत नाहीत आणि मार्गही काढत नाहीत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आपले आव्हान आहे की, त्यांनी एकदा जाहीरपणे ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठीची तिहेरी चाचणी काय आहे आणि एंपिरिकल डेटा गोळा कसा करायचा हे सांगावे. महानगरपालिकांच्या वॉर्डांची महिला आरक्षणाची सोडत ३१ मे रोजी पूर्ण झाली की त्यानंतर एंपिरिकल डेटा गोळा केला आणि न्यायालयाने तो स्वीकारला तरी ओबीसींना राजकीय आरक्षण मिळणे अवघड होईल.

**सुधीर मुनगंटीवार म्हणाले, ओबीसींच्या शत्रूशी आमचे युद्ध सुरू झाले आहे. या भावनेने येथे ओबीसी बांधव आले आहेत. महाविकास आघाडी सरकारकडे ठेकेदारांना देण्यासाठी पैसे आहेत पण ओबीसींची बाजू न्यायालयात मांडणाऱ्या वकिलांची फी देण्यासाठी पैसे नाहीत. मध्य प्रदेशमध्ये मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या सरकारने ओबीसी राजकीय आरक्षण टिकविले आहे. महाविकास आघाडी सरकारला ओबीसी बांधवांबद्दल प्रेम असेल तर त्यांनी मध्य प्रदेशात मंत्र्यांची समिती पाठवून शिवराजसिंह चौहान यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे.**

# नागोठण्यातील रस्त्याच्या कामाला सुरुवात

## भाजप शहराध्यक्ष सचिन मोदी यांच्या मागणीची दखल

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे हायवे नाक्यावरील सरकारी दवाखानाजवळ नागोठणे शहरात प्रवेश करताना किंवा शहरातील मार्गावर जाताना रस्त्यावर टाकण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉक वरून मोटरसायकलस्वार पदचारी व चारचाकी वाहनांना जावे लागते, परंतु या पेव्हर ब्लॉकच्या काठावर तीव्र स्वरूपाची धार असल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होता. हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा अन्यथा भाजप नागोठणे शहराच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी कार्यकारी अभियंता नॅशनल हायवे पनवेल यांना एका निवेदनाद्वारे दिला होता. याची त्वरीत दखल घेण्यात येवून कामाला सुरुवात करण्यात आली.

दरम्यान पेव्हर ब्लॉक रस्त्यामुळे एखाद्या व्यक्तीस कुठल्याही प्रकारे हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नॅशनल हायवे कार्यालयाची असेल असा इशाराही सचिन मोदी यांनी दिला होता.

दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावर सतत वाहनांची रहदारी असते. या रस्त्यामुळे जर एखादी गाडी घसरली तर त्या गाडीला महामार्गावरील इतर वाहने अक्षरश: चिरडून नेऊ शकतात. त्यामुळे पुढे मोठा अनर्थ होऊ शकतो. या रस्त्यामुळे एखादा निरपराध व्यक्तीचा जीव गेल्यास आम्ही नॅशनल हायवेच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार असल्याचेदेखील त्या वेळेसची मोदी यांनी निवेदनात म्हटले होते.

याबाबत या कार्यालयातील मुख्य अभियंता प्रशांत फेंगडे यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही तातडीने या बाबीची दखल घेऊन दुरुस्तीसाठी माणसे पाठविले असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान कामामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# पोलादपूरची आरोग्यसेवा विस्कळीत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात अनेक वर्षांपासून सुविधांचा अभाव आहे. रिक्तपदांमुळे अतिरिक्त भार कर्मचाऱ्यांवर पडत असल्यामुळे ग्रामीण जनतेला आरोग्याच्या दृष्टीने अडचणींचा सामना करावा लागत आहे. दोन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनाच्या लाटेनंतर रुग्णालय अद्ययावत करण्याची योजना आखण्यात आली होती. मात्र पुढील काळात याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

रुग्णालय परिसराजवळ कशेडी घाट व आंबेनळी घाट असे दोन घाट आहेत. या घाटांमध्ये सातत्याने अपघात घडत असतात. तसेच महामार्गावरही छोटे-मोठे अपघात घडत असतात. मात्र, या रुग्णालयात एक्स-रे मशीन नसल्याने अपघातग्रस्त रुग्णांची हेळसांड होत आहे. गंभीर रुग्ण असल्यास तत्काळ महाड, माणगाव, मुंबई, पुणे अशा ठिकाणी हलवावे लागते. त्यात २७ पैकी ९ पदे रिक्त असल्याने अतिरिक्त भार अन्य कर्मचाऱ्यांवर पडत आहे. त्यामुळे शासनाने ही पदे तातडीने भरून रुग्णालयात तत्काळ सोयीसुविधा पुरवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

**अशी आहेत रिक्तपदे**

पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक वर्ग एकचे पद भरले आहे. वैद्यकीय अधिकारी पदे वर्ग दोनची तीन पदे मंजूर असूनही ती रिक्त आहेत. तर सहाय्यक अधिकारीवर्ग तीनचे एक मंजूर पद भरले आहे. कनिष्ठ लिपिक वर्ग तीनचे दोनपैकी एक पद रिक्त आहे. क्ष किरण वैज्ञानिक अधिकारीवर्ग तीनचे एक मंजूर पद रिक्त आहे. कक्ष सेवक वर्ग चारच्या चार मंजूर पदांपैकी एक पद भरले असून तीन पदे रिक्त आहेत. शिपाई पद रिक्त आहे.

**रुग्णालयात सद्यस्थितीत आंतर रुग्ण व बाह्यरुग्ण कक्ष सुरू आहे. यासाठी लागणारा औषधसाठा परिपूर्ण आहे. श्वानदंश, सर्पदंश यासाठी अत्यावश्यक असणारी औषधे उपलब्ध आहेत.**
**-भाग्यरेखा पाटील, वैद्यकीय अधीक्षक**

**गेली अनेक वर्षे पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची जागा रिक्त आहे. आम्ही मागणी करूनही या जागा भरल्याच जात नाहीत. त्यासाठी आगामी काळात जनआंदोलन उभारले जाईल.**
**-चंद्रकांत कळंबे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष**

# पोलीस पाटील, ग्रामसुरक्षा रक्षकांची भूमिका महत्त्वाची -प्रशांत स्वामी

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्याचे कायदा आणि सुरक्षा व्यवस्थेत पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा रक्षक दलाला विशेष महत्त्व असत. म्हसळा तालुक्यातील पोलीस पाटीलांसह श्रीवर्धन दिघी सागरी या दोनही पोलीस स्टेशन अंर्तगत असणाऱ्या पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा रक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. यासाठी आज पोलीस प्रशासनाच्या माध्यमांतून त्यांचा विशेष सत्कार करत असल्याचे श्रीवर्धनचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत स्वामी यांनी म्हसळा पोलीस स्टेशनने आयोजित कार्यक्रमांत सांगितले.

पोलीस पाटील हे शासन आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्यातही ते समन्वयाची भावना कर्तव्य समजून ठेवतात असेही स्वामी यांनी यावेळी सांगून तालुक्याचे कायदा आणि सुरक्षा व्यवस्थेत पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा रक्षक दलाचे विशेष महत्त्व आहे असे सांगितले. मुंबईलगत असलेल्या रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांची लोकसंख्या पाहता येथील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तालुका पोलीस ठाण्यातील पोलिसांची संख्या ही कितीतरी पटीने कमी आहे तशी ती म्हसळा तालुक्यातही अल्प असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेत पोलिसांना मदत म्हणून गाव पोलीस पाटील आणि ग्राम सुरक्षा रक्षक दलाचा सहकार्य नक्कीच मोलाचा ठरत आहे.

म्हसळा पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा रक्षक दल यांनी म्हसळा शहरात साजरे झालेले सण उत्सवांत म्हसळा पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून कामकाज पाहिले होते, त्या अनुषंगाने म्हसळा पोलिसांनी त्यांचे कामाची दखल घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीवर्धन प्रशांत स्वामी यांच्या हस्ते म्हसळा तालुक्यातील सर्व पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा दल सैनिक यांचा गुलाबपुष्प देऊन विशेष सत्कार करण्यात आला. म्हसळा पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी पोलीस पाटीलांना मार्गदर्शन केले.



# वाहनांना बंदी असलेल्या माथेरानमध्ये प्रेक्षणीय स्थळांवर दुचाकींची सैर

**कर्जत : बातमीदार**

माथेरान या पर्यटन स्थळावर येणारे पर्यटक यांच्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रेक्षणीय स्थळाचे रस्ते यांचे मजबुतीकरण केले जात आहेत. मात्र त्या रस्त्यांचा गैरवापर सऱ्हास होताना दिसत आहे. हौशी दुचाकीस्वार हे आपली वाहने सातत्याने नेत असून अशा दुचाकीस्वार यांच्यावर प्रशासन कारवाई करणार आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

माथेरान या वाहनांसाठी बंदी असलेल्या कर्जत तालुक्यात आणि मुंबईपासून सर्वात जवळ असलेल्या पर्यटन स्थळावर पर्यटकांसाठी चांगले रस्ते बनविले जात आहेत. त्यात माथेरानच्या दस्तुरी भागात पॅनोरमा पॉईंट हे प्रेक्षणीय समजले जाणारे स्थान आहे. त्या प्रेक्षणीय स्थळांकडे जाण्यासाठी असलेला रस्ता २००५च्या अतिवृष्टीत वाहून गेला होता. त्यानंतर शासनाकडे मागणी केल्यानंतर पॅनोरमासह माथेरान मधील अन्य प्रेक्षणीय स्थळे यांचे सुशोभीकरण केले जात आहे. त्यातून माथेरानमधील पॅनोरमा पॉईंटच्या सुशोभीकरण करण्यात आले आहे. त्यात त्या ठिकाणी जाणारा रस्ता तयार केला आहे. त्या रस्त्यावर सुरुवातीच्या काळात अनेक चारचाकी वाहने यांची वर्दळ सुरु होती. त्यानंतर चारचाकी वाहनांबद्दल गोंगाट झाल्यानंतर चारचाकी वाहनांची वर्दळ थांबली आहे.

मात्र सध्या दुचाकी वाहने या पॉईंटवर दररोज ये-जा करीत आहेत. त्या वाहनांना कधी आणि कोण अडविणार हे प्रशासनाने ठरवायला हवे. दस्तुरी ते पॅनोरमा पॉईंट या मार्गावर मोठ्या प्रमाणात झाडे असून त्या झाडांवर पक्षी तसेच प्राणी यांना वाहनांच्या वर्दळीमुळे त्यांची पिळवणूक होत आहे. हे लक्षात घेऊन प्रामुख्याने पॅनोरमा पॉईंट कडे सुरु असलेली वाहने यांची वर्दळ थांबविण्याची गरज आहे.

माथेरान गिरिस्थान नगरपरिषद यांच्याकडून पॅनोरमा पॉईंटपर्यंत वाहने जाऊ नयेत यासाठी काही उपाययोजना करण्याची गरज आहे. मात्र त्या भागात ददरोज ये-जा करीत असलेल्या वाहनांना कोण बंदी घालणार असा प्रश्न आहे.

माथेरानमध्ये वाहनबंदी आहे आणि त्यामुळे वाहणारे नेणारे वाहनचालक आणि त्यांच्या वाहनांवर वन विभाग आणि पोलीस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी या दरम्यान होत आहे.

**सदर प्रेक्षणीय स्थळाचे सुशोभीकरण एमएमआरडीए कडून करण्यात आले आहे. त्यामुळे दस्तुरी वाहनतळ ते पॅनोरमा पॉईंट या दरम्यान वाहने जाणार नाहीत, याची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांची आहे. मात्र त्या भागात वाहने जाऊ नयेत आणि परिसरातील शांतता भंग होऊ नये यासाठी काय नियोजन करता येईल याचा अभ्यास आम्ही करीत आहोत.**
**-सुरेखा भणगे, मुख्याधिकारी नगरपालिका**

**आम्ही पॅनोरमा पॉईंटकडे जाणारा रस्ता नव्याने करून घेतला तसेच पॅनोरमा पॉईंट भागात सुशोभीकरण देखील पूर्ण केले. त्यानंतर त्या प्रेक्षणीय स्थळांचे काम आमच्या निविदेप्रमाणे पूर्ण झाल्याने आम्ही विकसित केलेला पॅनोरमा पॉईंट पालिकेकडे हस्तांतरीत केला आहे. आता पालिकेने त्या भागात वाहने जाणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे.**
**-अरविंद धाबे, कार्यकारी अभियंता एमएमआरडीए**

**दोन दुचाकींवर आम्ही कारवाई केली असून यापूर्वी देखील असे प्रकार झालेले आहेत. मात्र त्यावेळी त्या वाहनांचे क्रमांक मिळाले नव्हते. मात्र नेहमी घडणारे हे प्रकार लक्षात घेऊन आम्ही वन विभागाला लोखंडी बॅरिकेटस् लावण्याची सूचना केली आहे.**
**-शेखर लव्हे, सहाय्यक पोलीस निरीक्षक माथेरान**


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १५ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रुपवली ता. महाड येथे बौध्दवाडी करिता सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (सामाजिक विकास योजना) | १२०१४०३ | सु.बे.अ. | ५६०/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| २ | मौजे किंजळोली बु. तालुका महाड येथे बौध्दवाडी करिता सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.(सामाजिक विकास योजना) | ११९९३७५ | सु.बे.अ. | ५६०/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ३ | मौजे मुमुर्शी तालुका महाड येथे बौध्दवाडी करिता सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.(सामाजिक विकास योजना) | १२८६८९८ | सु.बे.अ. | ५६०/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ४ | मौजे कोंडीवते तालुका महाड येथे बौध्दवाडी करिता सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.(सामाजिक विकास योजना) | ११९७०५८ | सु.बे.अ. | ५६०/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ५ | मौजे कुसगांव तालुका महाड येथे बौध्दवाडी करिता सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.(सामाजिक विकास योजना) | १३२९३८८ | सु.बे.अ. | ५६०/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ६ | तुडिल भेलोशी मंडणगड रस्ता प्र.जि.मा. ६६ कि.मी. २/४०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम २०२१-२२_ व्दितीय सुचना/फेरनिविदा) | ११०३२३२ | सु.बे.अ. | ५६०/- | ३ महिने | सु.बे.अ. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२७/०५/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१०/०६/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **१३/०६/२०२२** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

सही/
(एम. आर. नामदे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२२०२
दिनांक : २४/०५/२०२२
विमाका/कोवि/२०२२-२०२३/४५


# चिमुकल्या हिंदवीचा वारू चौफेर!

## यंगेस्ट हॉर्स रायडर्स म्हणून इंडिया बूक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथे राहणारी हिंदवी निखिल यादव या अवघ्या दोन वर्षे चार महिन्यांच्या चिमुकलीने घोडेस्वारी प्रकारात कौशल्य सादर करत 'यंगेस्ट हॉर्स रायडर्स' चा किताब पटकाविला असून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्याची नोंद झाली आहे. अवघ्या दोन वर्षांच्या हिंदवीची घोड्यावरील पक्की मांड पाहून अनेकजण तोडांत बोट घालत आहेत.

हिंदवीचे वडील निखिल यांना लहानपणापासून घोडेस्वारीची आवड होती परंतु त्यांची इच्छा पूर्ण झाली नव्हती. हिंदवीचे आई वडील दोघेही प्राणी मित्र आहेत. हिंदवीवर गर्भसंस्कारात प्राण्याविषयी आवड निर्माण झाली असे तिची आई श्वेता अभिमानाने सांगते.

हिंदवीने अवघ्या दुसऱ्या वर्षी घोडेस्वारीचा सराव करण्यास सुरुवात केली. पुणे-मुंबई महामार्गावर गुडविल स्टड फार्म येथे ती घोडेस्वारीचा सराव करत आहे. हिंदवीचे पालक तिला गुडविल स्टड फार्ममध्ये घेऊन गेल्यानंतर एवढ्या छोट्या मुलीला घोडेस्वारी कशी जमणार आम्ही पाच वर्षावरील मुलांना प्रवेश देतो असे उत्तर मिळाले होते. परंतु मुलीमध्ये असलेल्या उपजत गुणांची पालकांना पुरेपूर कल्पना असल्याने एकदा तिला संधी द्या अशी पालकांनी विनवणी केली आणि पहिल्यांदा घोड्यावर टाच मारलेल्या हिंदवीने पुढे इतिहास घडवला.



### विविध प्रकारची सादर केली प्रात्यक्षिके

**यापूर्वी 'यंगेस्ट हॉर्स रायडर' हा किताब इंदूर येथील २ वर्षे ७ महिन्यांच्या चिमुकल्याच्या नावावर होता, मात्र हा रेकार्ड मोडीत काढत हिंदवीने देशातील 'यंगेस्ट हॉर्स रायडर' किताब पटकावणारी सर्वांत लहान मुलगी ठरली आहे. तिने ५० मिनिटे घोडा चालवून वेगवेगळ्या १३ विविध प्रकारांमध्ये प्रात्यक्षिके सादर केली.**

**आम्ही दोघेही पती-पत्नी प्राणी मित्र आहोत. हेच गुण आवड हिंदवीमध्ये उतरले आहे. हिंदवीच वेगळेपण आम्हाला कळले. त्यामुळेच ती घोडेस्वारी करु शकेल असा विश्वास वाटत होता. चार महिने प्रशिक्षणात तिने खूप आत्मसात केले आहे. तिचे घोडेस्वारीत गुरू दिनेश आखाडे, आणि नितीन विघ्ने यांचा फार मोठा वाटा हिंदवीला घडविण्यात आहे.**
**-श्वेता निखिल यादव**





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. २६ मे २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# आंबे खरेदी करताना सावधान!

## उरणमध्ये खराब फळाची विक्री; ग्राहकांची फसवणूक; आरोग्यही धोक्यात

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उन्हाळी मोसम म्हणजे जांभळे, करवंदे, फणस आणि फळांचा राजा हापूस आंबा या रानमेव्याने ओथंबून गेलेला हंगाम याला उरण बाजारपेठ अपवाद नाही. कोणताही माल ग्राहकांच्या माथी मारण्यात तरबेज असणारे काही विक्रेते बेमालूमपणे आंब्याची विक्री करत आहेत. ग्राहकांनी खरेदी केलेला हा आंबा कापून पहिला की एक डझन आंब्यांतील कमीतकमी तीन ते चार आंबे हे जाळीदार असल्याचे निष्पन्न होत असल्याने ग्राहकांची फसवणूक होत आहे.

काही विक्रेते हे आपण आंब्याची बागच विकत घेतल्याचे भासवून चक्क नवी मुंबई वाशीच्या फळबाजारांतून आणलेल्या पेट्यांतील आंबा हा आपल्याच बागेतील असल्याचे भासवून चढ्या भावात विक्री





करतात. उरणच्या बाजारपेठेत अलिबाग-रेवसकडून येणारा आंबाही आपल्याच घरातील परसबागेतील आंबा असल्याचे भासवित विक्री करण्यात येतो, परंतु प्रत्यक्षात हा आंबा त्यांनी साठेवाल्यांकडून विकत घेतलेला असतो. यामध्ये काही आंबे विक्रेते हे वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे आंबा विकण्याचा व्यवसायही उरणच्या बाजारपेठेत करीत आहेत.

उरणच्या बाजारपेठेत बहुतांशी येणारा आंबा हा नवी मुंबई वाशीच्या फळ बाजारांतील येणाऱ्या पेटीमधील आंबा आहे. हा वाशी बाजारात कोकणातील विविध भागांमधून येत असून वाशी बाजारात येताच काही घाऊक विक्रेते बेमालूमपणे यातील आंब्याची हेराफेरी करून पेटीचे पॅकिंग व्यवस्थितपणे करून उरणसारख्या बाजारपेठेत पाठवून देतात. आंबे तपासून घेण्याचे कोणतेही प्रमाण नसल्याने ते प्रत्यक्षात तपासून घेता येत नाहीत. त्यामुळे आंबे डझनाला ५०० ते ६०० रुपये इतका चढा भाव देऊनही घरी घेऊन गेलेल्या एक डझन आंब्यातून सुमारे तीन ते चार आंबे आतून जाळीदार झालेले निघतात व ग्राहकाचे नुकसान होते.

कधीकधी कोवळे आंबे अडीत टाकून पिकविलेले असतात तर कधी पडलेले आंबेही अडीत टाकून विक्रीस आणले जात आहेत. त्यामुळे आंब्यांना चढा भाव देऊनही ग्राहकांची फसवणूक होत आहे. आंबे कापल्यानंतर आतमध्ये ते जाळीदार निघतात आणि तो आंबा ग्राहक परत घेऊन गेल्यास आम्ही काय आंब्यात शिरून पहिले होते, असे उद्धटपणाचे काही विक्रेत्याचे उत्तर ऐकून घ्यावे लागते.

### असे ओळखा चांगले आंबे

**आंबे विकत घेणार असाल तर त्याला कोणतेही प्रमाण नसले तरी, बादलीभर पाण्यात आंबे टाकल्यास त्यातील जे आंबे पाण्यावर तरंगतील ते आतून हमखास जाळीदार अथवा खराब असतील आणि जे आंबे पाण्याच्या तळाला खाली जाऊन बसतील ते चांगले व खाण्यास योग्य आहेत असे समजावे. सध्यातरी हेच तपासणीचे प्रमाण सिद्ध झाले आहे.**

# खारघरमध्ये होणार दैनिक बाजार विकसित

## सभापती हर्षदा उपाध्याय यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : प्रतिनिधी**

महिला व बालकल्याण सभापती हर्षदा अमर उपाध्याय यांच्या एक वर्षाच्या पाठपुराव्याला यश येऊन खारघरमध्ये दैनिक बाजार विकसित करण्याला मंगळवारच्या महासभेत मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेकडे सिडकोमार्फत हस्तांतर झालेले खारघर, सेक्टर १२ मधील ८७६.१४ चौ.मी क्षेत्रफळ असलेला उ-४६ क्रमांकाचा भूखंडावर दैनिक बाजार विकसित करण्याच्या प्रस्तावास मंगळवारच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यता देण्यात आली आहे. लवकरच येथे सुसज्ज दैनिक बाजार उभारून ४३ फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध होणार आहे.

या भूखंडाशेजारी जुने खारघर पोलीस स्टेशन असल्यापासूनचे सर्व प्रकारच्या अवजड वाहनांनी या भूखंडाची ७० टक्के जागा व्यापली गेली होती व ३० टक्के जागा उपलब्ध होती. तेथे पंधरा वर्षांपासून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते. तेथील नागरिकांना वारंवार आरोग्याच्या दृष्टिकोनातून होणारा त्रास लक्षात घेऊन खारघरचे तत्कालीन सीनिअर पोलीस इन्स्पेक्टर शत्रुघ्न माळी व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तसेच सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सहकार्यामुळे या भूखंडावरील वाहने नवीन खारघर पोलीस चौकी समोर स्थलांतरित करण्यात येऊन भूखंड स्वच्छ करून ३० ते ३५ फेरीवाल्यांना तेथे व्यवसाय करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती

काही समाजकंटक राजकारणी लोकांच्यामुळे तेथील फेरीवाल्यांनी स्वखर्चाने बांधलेल्या प्लास्टिक शेड वर्षभरात साधारण तीन वेळा कधी सिडको तर कधी महापालिकेमध्ये वारंवार तक्रार करून तोडण्यात आले. पनवेल महापालिकेच्या आयुक्तांनी या विषयांकडे गांभीर्याने लक्ष दिल्यामुळे हा विषय सभागृहात मंजूर झाला.

# उरण तालुक्यातील काही गावांत पूरपरिस्थितीचा धोका

## पालकमंत्र्यांनी पाहणी करण्याची मागणी

**उरण : वार्ताहर**

पावसाळा सुरू होण्यास काही दिवसांचा कालावधी उरला आहे. तरीही काही ग्रामपंचायतींनी आपापल्या हद्दीतील गटारातील गाळ, नाल्यातील झाडे, झुडपे यांची साफसफाई केली नाही. सिडकोने सिडकोबाधित ग्रामपंचायत हद्दीतील नाल्यांची साफसफाई केली नाही तसेच खाडी किनाऱ्यावरील होर्डींग पाईपची साफसफाई केली नाही. त्यामुळे यावर्षी पावसाचे पाणी तालुक्यातील अनेक गावांत शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे, असा आरोप नागरिकांमधून होत आहे.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी बैठकीच्या माध्यमातून या वर्षी उद्भवणाऱ्या संभाव्य पूरपरिस्थितीवर उपाययोजना करण्याचा आढावा बैठकीच्या माध्यमातून घेतला आहे तसेच पावसाळ्यापूर्वी प्रत्येक प्रभागातील, गावातील कामे मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकारीवर्गाला आदेश जारी केले आहेत, परंतु संबंधित शासकीय अधिकारीवर्गाने पालकमंत्र्यांच्या आदेशाची अंमलबजावणी न करता आपापल्या परिसरातील गटारातील गाळ, नाल्यातील झाडे, झुडपांची साफसफाई अद्याप केलेली नाही. सिडकोने सिडकोबाधित ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्यावरील होर्डिंग पाईपची साफसफाई केली नाही. त्यामुळे काही ग्रामपंचायत हद्दीतील गावांत पावसाचे पाणी शिरून पूरपरिस्थिती निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

कागदावर झालेल्या गटार, नालेसफाईवर विश्वास न ठेवता पालकमंत्री आदिती तटकरे यांनी प्रत्यक्षात पाहणी करावी, अशी मागणी पूरग्रस्त नागरिक करीत आहेत.



# मच्छीविक्रेत्या महिलेची लूट

## पनवेल रेल्वे पोलिसांकडून गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

ठाण्यातून मच्छी विक्री करून सीबीडीतील दिवाळे गावात परतणाऱ्या मच्छी विक्रेत्या महिलेच्या गळ्यातील ८२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञाताने लुटून पलायन केल्याची घटना सीबीडी बेलापूर रेल्वे स्टेशनच्या सबवेमध्ये घडली. पनवेल रेल्वे पोलिसांनी या लुटारुविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील तक्रारदार मिना महादेव कोळी (वय ५४) या सीबीडी बेलापूर येथील दिवाळे गावात राहण्यास असून त्यांचा मच्छी विक्रीचा व्यवसाय आहे. मिना कोळी या नेहमीप्रमाणे ठाणे येथे मच्छी विक्री करण्यासाठी गेल्या होत्या. त्यानंतर त्या ठाणे येथून लोकलने सीबीडी-बेलापूर रेल्वे स्थानकावर उतरल्यानंतर डोक्यावर मच्छीची पाटी आणि हातात बास्केट घेऊन दिवाळे गाव येथे जाण्यासाठी सबवे तून खाली उतरत होत्या.

याचवेळी पाठीमागून आलेल्या अज्ञाताने मिना कोळी यांच्या गळ्यातील एक तोळे ७५० ग्रॅम वजनाचे ८२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून रेल्वे स्टेशनवर पलायन केले. त्यामुळे मिना कोळी यांनीदेखील लुटारुच्या पाठीमागे धाव घेतली, मात्र लुटारु लोकल गाडीत चढून दुसऱ्या फलाटावर उतरुन पळून गेला. त्यामुळे मीना कोळी यांनी दुसऱ्या लोकलने सीवुडस् रेल्वे स्टेशनवर जाऊन लुटारुचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो त्यांना सापडला नाही.

यानंतर त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात लुटारुविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

# पनवेलमध्ये बालव्यक्तिमत्व विकास शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय पनवेल शाखेकडून बालव्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन २३ ते २५ मेदरम्यान सायंकाळी ५ ते ७ वाजता पनवेल हुतात्मा स्मारक गार्डन येथे करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ परिसरातील बालकांनी घेतला. त्यांना शिबिरात योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन सोमवारी (दि. २३) दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या वेळी योग शिक्षिका अनिता बहेन म्हणाल्या की, शरीर तंदुरुस्त आणि मनस्वास्थ्य



ठीक राहण्यासाठी योग आणि ध्यानधारणेची आवश्यक आहे. तारादीदी यांनी प्रकृती, विकृती आणि संस्कृती यावर एक गोष्ट सांगितली. दिव्य गुण धारण करून भगवान श्रीकृष्ण सारखे बना असे मार्गदर्शन केले.

या वेळी पत्रकार मिलिंद खारपाटील यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी अर्चना झा, निंकुज, दीप्ती झा, राजश्री म्हस्के नयना पाटील, शकुंतलादीदी, तारादीदी या सर्व शिक्षकांनी उपस्थित बालकांना योग्य मार्गदर्शन केले.

# मोरा जेट्टीच्या स्वच्छतागृहाची दूरवस्था

## मेरीटाईम बोर्डाचे दुर्लक्ष

**उरण : वार्ताहर**

उरण येथील मोरा जेट्टीच्या शौचालयाची ही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, मात्र त्याकडे मेरीटाईम बोर्डचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. मेरीटाईम बोर्डने या समस्यानकडे जातीने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवासी विशेष करुन महिला वर्ग करीत आहे.

भाऊचा धक्का (मुंबई) व घारापुरी बेटावर जाण्यासाठी मोरा जेटीचा वापर सर्रास प्रवाशी नागरीक करत आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांसाठी मोरा जेटीवर मेरिटाइम बोर्ड मार्फत ज्या सुख सोयी असायला हव्या आहेत. त्या दिल्या जात नाहीत. विशेष म्हणजे मुख्य गोष्ट शौचालय चांगल्या प्रकारे असायला आहे, परंतु मोरा जेटीवर असे काहीच दिसत नाही. जेटीवर शौचालयाची दुरवस्था झाली असून दरवाजे ही मोडक्या अवस्थेत आहेत. यामुळे विशेष



म्हणजे महिला वर्गाला याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर या समस्येकडे लक्ष द्यावे, अशी मागणी महिला वर्ग करीत आहेत. सफाई कामगार नाही त्यामुळे साफ सफाई ची कामे होत नाहीत पाण्याची सोय नाही. लाईटची सोय नाही, शौचालायास दरवाजेही नाहीत.

मोरा ते मुंबई या जल प्रवासास एकेरी भाडे (तिकीट) ८० रुपये आहे व २६ मेपासून ते भाडे १०५ रुपये होणार आहे. दररोज मुंबई येथे जाण्यासाठी शेकडो प्रवासी प्रवास करीत आहेत. उत्पन्न चांगले साधन असूनसुद्धा प्रवाशाच्या सुख सोयीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**मोरा जेटीच्या दुरुस्तीचे टेंडर मेरिटाईम बोडने काढले आहे. लवकरच दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करून प्रवाशांची गैरसोय दूर केली जाईल.**

**-पी. बी. पवार, बंदर निरीक्षक, मोरा**

# 'महाज्योती'तर्फे तृतीय रत्न नाट्यप्रयोग

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

महाराष्ट्र सरकारची महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात महाज्योती संस्थेच्या माध्यमातून महात्मा फुलेंच विचार सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या कार्यक्रमाचा भाग म्हणून आयोजित महात्मा ज्योतिबा फुलेंनी लिहलेल्या तृतीय रत्न हा नाट्यप्रयोग पनवेलमधील फडके नाट्यगृहात होणार आहे.

राज्यभरात होणाऱ्या तृतीयरत्न नाटकाचे दिग्दर्शन नाट्यकलाकार अनिरूध्द वनकर यांनी केले आहे. २७ मे रोजी रात्री ८ वाजता प्रयोग होणार आहे. या प्रयोगासाठी सर्वांना मोफत प्रवेश असणार आहे. सामाजिक प्रबोधनाचा विचार मांडणाऱ्या नाटकासाठी जास्तित जास्त संख्येने उपस्थिती लावण्याचे आवाहन राज्य सरकारच्या ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केले आहे.

नाटकाच्या प्रयोगासाठी मोफत पास मिळावेत यासाठी महेंद्र कांबळे ९६१९७८८८४६, वामन मोरे ९०८२१८९४५८ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पनवेलमध्ये एमपीएससी मार्गदर्शन आणि अनुभवकथन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील लक्ष्य अकॅडमीतर्फे रविवारी (दि. २९) विद्यार्थ्यांसाठी मोफत करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात दहावी, बारावी, पदवीधारक विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

लक्ष्य अकॅडमी येथे हे मार्गदर्शन शिबिर होणार आहे. सकाळी १०.३० वाजता सुरू होणाऱ्या या शिबिरात एमपीएससी २०२० मध्ये झालेल्या राज्यसेवा परीक्षेत



ओबीसी महिला वर्गातून प्रथम आलेल्या लक्ष्य अकॅडमीच्या पनवेल शाखेच्या विद्यार्थीनी असलेल्या सायली श्याम ठाकूर मार्गदर्शन करतील.

शिबिरात एमपीएससी या नागरी सेवा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या परीक्षांमध्ये यश मिळविण्याचा मंत्र, तयारी, मुलाखतीचे तंत्र तसेच विद्यार्थ्यांचा प्रश्नाला उत्तरे दिली जातील. नाव नोंदणीसाठी अधिक माहितीसाठी ८२९१२२००१४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

## अज्ञात महिलेच्या मृतदेहप्रकरणी तपास

**पनवेल :** एका अज्ञात महिलेचा मृतदेह पनवेलजवळील कुंडेवहाळ गावाच्या हद्दीतील कान्होबा ढाबा परिसरात आढळून आला होता. यासंदर्भात पनवेल शहर पोलीस सर्वत्र शोध घेत आहेत. महिलेचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे, उंची पाच फूट, मृतदेह गोधडीत गुंडाळलेला, तर दोन्ही पाय पांढ्या चिंधीने बांधलेले तसेच डोक्याचे केस काळे व लांब आहे. डोळे नाक व दोन्ही कान कुजलेले सडलेले आहे असून अंगात निळा-राखाडी टॉप, गुलाबी पायजमा आहे. या महिलेबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे, ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस निरीक्षक (प्रशासन) दिलीप शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.



**पनवेल : वडाळा तलावाचे सुशोभीकरण चांगले राहावेम येणाऱ्या नागरिकांना स्वच्छता दिसावी यासाठी ॲड. हर्षद शहा, प्रादुल सिंग, साहील सिंग हे तेथील वॉकिंग ट्रॅकमध्ये स्वच्छता मोहीम राबवित असतात. या मुलांचे कौतुक होत आहे.**

# पनवेल महापालिकेचा कारभार पारदर्शक -आयुक्त गणेश देशमुख

**पनवेल : प्रतिनिधी**

बँक ऑफ इंडियाद्वारे पेमेंट कलेक्शन सेवेचे डिजिटलायझेशन केवळ नागरिकांनाच नाही तर पालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठीदेखील सोयीस्कर आहे. कारण या पॉस मशीन स्वयंचलित आहेत. यामुळे पारदर्शक कारभाराच्या दिशेने महापालिकेने महत्वाचे पाऊल टाकले असल्याचे आयुक्त गणेश देशमुख यांनी प्रतिपादन बँक ऑफ इंडिया आणि वर्ल्ड लाईनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सदिच्छा भेटीचे वेळी केले.

पनवेल महापालिकेत बुधवारी (दि. २५) बँक ऑफ इंडिया आणि वर्ल्ड लाईनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदिच्छा भेटी दिली. यावेळी बँक ऑफ इंडियाचे उपविभागीय प्रबंधक राजेंद्र कोकाटे, वर्ल्डलाईन संस्थेचे अध्यक्ष गुलशन प्रिथी, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखाअधिकारी संग्राम व्हारेकाटे, लेखा परिक्षक विनयकुमार पाटील, बँक ऑफ इंडियाचे अधिकारी, वर्ल्ड लाईन संस्थेचे अधिकारी उपस्थित होते. पालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी डिजिटल कलेक्शन सेवांचा विस्तार करण्यासाठी बँक ऑफ इंडिया आणि वर्ल्डलाइनसोबत काम करताना आम्हाला आनंद होत आहे आणि भविष्यातही असे नाविन्यपूर्ण प्रकल्प आम्ही त्यांच्याबरोबर राबवू, असे या वेळी आयुक्तांनी सांगितले.

सध्या प्रभाग समिती, रोज बाजार, स्वच्छता मार्शल्स पॉस् मशीनच्या माध्यमातून दंड, कर वसुली करत असून छापील पावती पुस्तकांच्या माध्यमातून करण्यात येणारी वसुली पूर्णतः बंद करण्यात आली आहे. यासाठी महापालिकेला बँक ऑफ इंडियाचे सहकार्य लाभले असून, वर्ल्डलाईन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या ८८ पॉस् मशीन्सचा माध्यमातून सर्व कर व दंड वसुली चारही प्रभाग समितीमध्ये केली जात आहे. या वेळी आयुक्त गणेश देशमुख आणि पालिका अधिकारी यांना बँक ऑफ इंडिया आणि वर्ल्ड लाईनच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



## संपादकीय


# सावधगिरीची गरज

मंकीपॉक्स या देवीसदृश आजाराच्या जगभरात १००हून अधिक केसेस नोंदल्या गेल्या असून आणखी तितक्याच संशयित रुग्णांची नोंद झाली आहे. ही आकडेवारी जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केली असून या केसेस एकूण २० देशांमधील आहेत. भारतात तूर्तास एकही केस नोंदली गेलेली नाही. जगभरातील केसेसचे प्रमाण अद्याप तरी आटोक्यात आणण्याजोगे असले तरी आता कुठे कोरोनाच्या महासाथीतून जग सावरत असल्यामुळे सगळीकडेच त्याविषयी चिंता व्यक्त होत आहे.

**आपल्याकडे काही वर्षांपूर्वी आढळणाऱ्या देवीच्या साथीसारखाच हा आजार असला तरी देवीच्या तुलनेत यातील मृत्यूचे प्रमाण पाहता तो सौम्य मानला जातो. विशेषत: आफ्रिकन देशांमध्ये मंकीपॉक्स गेली काही दशके माफक प्रमाणात दिसून आला आहे. त्यामुळेच आता अचानक जगभरातील निरनिराळ्या देशांमध्ये या रोगाचा फैलाव दिसून येणे तज्ज्ञांनाही आश्चर्यकारक वाटते आहे. सध्या या आजाराचे सर्वांत जास्त रुग्ण पोर्तुगाल, स्पेन आणि ब्रिटन या देशांमध्ये आढळले आहेत. त्याखेरीज ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, अमेरिका, इटली, जर्मनी, फ्रान्स, स्वीडन, नेदरलँड्स, कॅनडा या देशांमध्येही मंकीपॉक्सच्या रुग्णांची नोंद झाली आहे. या सर्व केसेसचा परस्परांशी काही संबंध आहे की हा फैलाव सगळीकडे निरनिराळ्या विषाणूमार्फत सुरू झाला आहे याबाबत लगेचच माहिती जमा झालेली नाही. या आजाराची लागण मूलत: प्राण्यांपासून माणसास होते. याच्या नावात मंकी अर्थात माकड असा उल्लेख असला तरी माकडांपासून हा आजार होतो असे नाही. कित्येक दशकांपूर्वी माकडांमध्ये हा आजार दिसू लागल्यावर शास्त्रज्ञांना त्याची माहिती झाली. यामुळे त्याचे नाव मंकीपॉक्स असे ठेवले गेले. अगदी अलीकडच्या काळात २००३ साली अमेरिकेमध्ये या आजाराच्या ७१ केसेस आढळल्या होत्या आणि त्या आफ्रिकेतून आलेल्या कुणा व्यक्तीमुळे नव्हे तर पश्चिम आफ्रिकी देशामधून आयात केलेल्या उंदरांमधून कुत्र्यांमध्ये संसर्ग होऊन नंतर माणसामध्ये त्याचे संक्रमण झालेले दिसले होते. सध्या आढळलेला मंकीपॉक्सचा विषाणू हा तीन-चार वर्षांपूर्वी अनेक देशांमध्ये आढळलेल्या या आजाराच्या विषाणूसारखाच बऱ्यापैकी आहे. म्हणजेच त्यात फारसा बदल झालेला नाही. साथ आटोक्यात ठेवण्याच्या दृष्टीने हे फार महत्त्वाचे आहे. अर्थात, हे सारे निष्कर्ष तूर्तास जुजबी माहितीवर आधारित आहेत. जगभरातून येणारी माहिती शास्त्रज्ञ सध्या पडताळून पाहात आहेत. नजीकच्या संपर्कातून या आजाराची लागण होते. लैंगिक संबंधातूनच ती होते असे नाही आणि समलिंगी संबंधातूनच ती होते असे तर मुळीच नाही याचा खुलासा शास्त्रज्ञांनी केला आहे. भिन्नलिंगी व्यक्तींच्या लैंगिक संबंधातूनही या आजाराची लागण होऊ शकते. मुळात लैंगिक संबंधांखेरीज कुठल्याही प्रकारे नजीकचा संपर्क आल्यास या आजाराचा फैलाव होऊ शकतो हे लक्षात घेण्याची गरज आहे. ताप, पाठदुखी, सांधेदुखी व त्यानंतर अंगावर, विशेषत: चेहऱ्यावर येणारा कांजिण्यांसारखा पुरळ अशी याची लक्षणे असतात. हा पुरळ आल्यानंतरच्या काळात त्यात जंतुसंसर्ग झाल्यासच जिवाला धोका संभवू शकतो. अद्यापपर्यंत या साथीत कुणीही दगावल्याचे वृत्त नाही. चांगल्या आरोग्यसुविधा उपलब्ध असलेल्या देशांमध्ये या साथीचा मृत्यूदर आजवर १ ते ३ टक्केच दिसून आलेला आहे. या आजारावरील लस उपलब्ध आहे आणि ती निदानानंतर दिल्यासही काम करते ही बाब सर्वाधिक दिलासादायक असली तरी सध्या सर्वांनी सावधगिरी बाळगणेच योग्य ठरेल.**

# फिटझगेराल्ड : आंबेनळी घाट







पोलादपूर ते महाबळेश्वरदरम्यान सुमारे ३२ किमी अंतराचा फिटझगेराल्ड म्हणजेच सध्याचा सर्वश्रुत आंबेनळी घाट पोलादपूर तालुक्यातील कापडे खुर्द येथून सुरू झाला आहे. पूर्वी शिवकाळात महाबळेश्वरपर्यंत अथवा त्याहीपुढे जाण्यासाठी महाडच्या आग्नेय दिशेने माझेरी, वरंध, शिवथरघळ, पिंपळवाडी असे २४ किमीचे सह्याद्री पर्वतराजीतून मार्गाक्रमण करून पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर गावाजवळ पारघाट सुरू होत असे. या मार्गाला आजही छत्रपती शिवाजी रस्ता म्हटले जाते. त्या काळी महाड ही तरत्या बंदराची उतारपेठ होती.

महाड तालुक्याला पोलादपूर पेट्याचा मुलूख १९४८पर्यंत जोडला होता. ब्रिटीशांनी पोलादपूरला महाल कचेरी ठेवली होती. स्वातंत्र्यानंतर १९५८ साली पोलादपूर हा स्वतंत्र तालुका अस्तित्वात आला, पण तत्पूर्वी १८२६पर्यंत पारघाट हाच शिवकालीन मार्ग सातारा, वाई, कराडपर्यंत वाहतुकीसाठी वापरात येत होता. महाडच्या तरत्या बंदराच्या उतारपेठेतून मीठ, सुकी मासळी, नारळ, विडयाची पाने आदी सामानाची वाहतूक पारघाटामार्गेच वर्षानुवर्षे होत असे. आजचे थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर शिवकाळात दंडकारण्यातील श्रीक्षेत्र महाबळेश्वर असे परिचित होते. पारघाटातून १८२६ पूर्वी महाबळेश्वरला जाणारी पायवाट होती. येथून बंजारा लोक मीठ आणि धान्याची वाहतूक करीत. पारघाटातून येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर घाटाच्या देखभालीसाठी जकात आकारली जात असे. ओझ्याच्या बैलासाठी तीन रूका, धान्य, भूसा व मिठाच्या गोणीसाठी तीन रूके, तंबाखू व उडीद सहा रूके, कापड बंगी पाव रूका आणि कांबळे (ब्लँकेट) ओझे नऊ रूके असे जकातीचे स्वरूप शिवकाळात होते.

पारघाटाला रडतोंडीचा घाट हा पर्यायी मार्ग होता. याखेरिज भोर संस्थानापासून कामथे आणि ढवळे घाट वाटसरूंसाठी वापरात होते, मात्र हा घाट दुर्गम व अवघड असल्याने येथून मालवाहतूक कठीण होती. सातारा, वाईशी कमी अंतरात पोहचण्याचा हा मार्ग बिकट तर होताच, पण या मार्गाची देखभाल दुरूस्ती करण्यासाठी खूप खर्च झाला. तरीही ब्रिटीशांना घोडागाडी अथवा मोटारगाडीसाठी उपयुक्त मार्ग तयार करण्याची आवश्यकता भासू लागल्याने पारघाटाच्या उत्तरेस ०.८१ किमी अंतरावर कापडे खुर्द गावाजवळ नव्याने घट बांधला. या घाटाला फिटझगेराल्ड म्हणत. हाच सध्याचा आंबेनळी घाट होय. या घाटाच्या उभारणीस १८७१ साली सुरुवात होऊन केवळ चार लक्ष ४४ हजार रुपये खर्च झाला. हा घाट पाचच वर्षांत वाहतुकीस खुला होऊन १८७६ सालापासून ब्रिटीश आणि व्यापारी घोड्याला लगाम न लावता कापडे खुर्दपर्यंत उतरत असत. या घाट उभारणीच्या काळातच महाबळेश्वरचा गिरीस्थान थंड हवेचे ठिकाण म्हणून ब्रिटीशांनी विकास केला.

शिवकाळात रायगडावरून निघाल्यावर समर्थ रामदासस्वामींचे दर्शन शिवथरघळीत घेतल्यानंतर पिंपळवाडीपासून महादेवाचा मुरा व तेथून सह्याद्रीच्या रांगांमधून थेट कांगोरीगडावर जात. शिवरायांनी हा गड हिंदवी स्वराज्यात आल्यावर त्याचे नाव मंगळगड ठेवले. तेथून पुढे ढवळागड म्हणजेच चंद्रगडावर विश्रांती आणि पारच्या देवीचे दर्शन. त्या वेळी पारला पार्वतीपूरही म्हणत असत आणि तिथे तुळजापूरची भवानीमाता हीदेखील रामवरदायिनीदेवी समवेत वास्तव्यास असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधानंतर या भवानीमाता देवीला खानाचा रूधीर टिळा लावल्याचा उल्लेख आहे. पुढे शिवरायांनी प्रतापगडावर म्हणजेच अफजलखानाच्या वधापूर्वीचा गुन्हागड येथे तुळजाभवानीची स्थापना केल्यानंतर देवळे येथील चित्रे कुटूंबाची रामवरदायिनी देवी कापडे बुद्रुक येथे पूजली जाऊ लागली. महिपतगड, कोंढवीगड, तानाजी मालुसरेंचे जन्मस्थान उमरठ गांव, सूर्याजी मालुसरेंची समाधी साखर ही शिवकालीन सृष्टी केवळ ब्रिटीशांनी फिटझगेराल्ड म्हणजे आंबेनळी घाट उभारल्यानंतर दृष्टीआड गेली आहे. त्यामुळे पोलादपूर ते महाबळेश्वरपर्यंत ऐतिहासिक व पर्यावरण पर्यटन क्षेत्र (इको टूरीझम) घोषित करून या मार्गाचा सुनियोजित विकास केल्यास या भागाचे महत्व वाढेल.

## खबरबात

**शैलेश पालकर**


पोलादपूर येथे मुंबई ते पणजी राष्ट्रीय महामार्गावर शिवछत्रपतींच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्यापासून मुंबईहून येणाऱ्या प्रवासी व पर्यटकांना राष्ट्रीय महामार्ग कोकणात, तर दुसरा राज्यमार्ग महाबळेश्वर, वाई, साताऱ्यापर्यंत घेऊन जातो. पोलादपूर या शहरातील 'शिवभारत'कार कवींद्र परमानंद यांच्या समाधीचे मठाचे दर्शन, पोलादपूरची ब्रिटीश जनरल क्रॉसवीसोबत मराठ्यांची शेवटची लढाई झाल्यानंतर त्या जनरल क्रॉसवीचे थडगे, यादवकाळात पोलस्तपूर असणारे ब्राह्मणकाळ व निझामशाहीत पोलादपूर नाव पडले. त्या पोलादजंग नावाच्या मुसलमान अधिकाऱ्याची कबर, स्कॉटीश मिशनरीचे रेव्हरंड डोनाल्ड मिचेल यांचे थडगे, अलिकडेच बांधण्यात आलेले सदगुरू मंदिर आणि लेप्रसी मिशन हॉस्पिटल ही ठिकाणे पाहिल्यानंतर पैठण रस्त्यावरून आत प्रतिमहाबळेश्वर असलेले थंड हवेचे अविकसित ठिकाण कुडपण व कोंढवीगड, मोरगिरी व मोरसडे येथे पावसाळ्यात टेकडयांवर मोर फिरतात ही पाहण्यासारखी ठिकाणे आहेत. तेथून परत आल्यानंतर रानबाजिरे येथील धरण परिसरात प्रसन्न वातावरणात पर्यटन विकास करण्यासाठी तरणतलाव, बोटींग क्लब, मासेमारी असे उपक्रम राबविता येतील. पावसाळ्यात पुढे खोपडचा मोरझोत धबधबा, घागरकोंडचा फेसाळणाऱ्या नदीच्या पात्रावरील झुलता लोहरजूंचा पूल पाहण्यासाठी तरुणाईची गर्दी उसळते. तानाजी मालुसरेंचे जन्मस्थान उमरठ गाव, सूर्याजी मालुसरेंची समाधी साखर, मंगळगड ही शिवकालीन सृष्टी आवर्जून दाखविल्यास इतिहासप्रेमीही निश्चितच सुखावतात. पोलादपूर तालुक्यातील कापडे ते देवळे हा भाग स्विर्त्झलँडसारखा छोट्या टेकड्या व दऱ्यांचा असल्याने मुंबईकरांनी पैसा गुंतवून निसर्ग सान्निध्यात टूमदार हवेल्याही बांधण्यास सुरुवात केली असून साप्ताहिक सुटी मिळताच ते निसर्ग सान्निध्यात धाव घेतात.

कापडे बुद्रुक येथील रामवरदायिनी देवीचे दर्शन घेतल्यानंतर आंबे, फणस, काजू, जांभळं, तोरणं, आळू, आसाणे असा फळे व रानमेव्याचा स्वाद घेत डोंगर झाडीतून वनभ्रमंती करण्यासाठी कुंभळवणे, पायटेवाडीपासून सुरूवात केल्यास घोडवती नदीच्या चिंचोळ्या उथळ पात्रातून पर्यटकांना आगळावेगळा आनंद मिळतो. तेथून पुढे दाभिळटोक भागात दऱ्यांत डोकाविताना आपण पक्षी होऊन विहंगम संचार करीत असल्याचा भास होतो. येथून काश्मीरी पहेलगामसारखे वाटीसदृश्य भागात वसलेले आदर्शगाव ढवळे इवलेसे दिसते.

आंबेनळी घाटात निसर्गसहवासाने तृप्त होताना तृषार्तही झाल्याची जाणीव होते. सध्या महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण पाहण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांची तसेच सातारा, वाई, कराड, कोल्हापूरपर्यंत जाणाऱ्या प्रवाशांची वाहतूक आंबेनळी घाटात मोठ्या प्रमाणात होते. हा संपूर्ण घाटरस्ता दुर्गम आणि त्याभोवतीच्या दऱ्या खोल असून दुसऱ्या बाजूला संरक्षक कठडे नसल्याने वाहने कोसळून अनेकांचे जीवन संपुष्टात आले आहे. पोलादपूर ते महाबळेश्वर या मार्गावरही दरवर्षी अपघात झाले आहेत. अलिकडेच येथे दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापिठाच्या बसला अपघात होऊन तब्बल ३० जण दगावले असल्याने भविष्यात तसा धोका निर्माण होणार नाही यासाठी खबरदारी घ्यावी लागणार आहे.

२२ जुलै २०२१ रोजी अतिवृष्टी आणि भुस्खलनामुळे पोलादपूर तालुक्यातील कापडे खुर्दपासून वरील भागात म्हणजे ब्रिटीशकालीन फिटझगेराल्ड घाटाच्या सुरुवातीपासूनच दरडी कोसळून राज्यमार्ग दरीमध्ये वाहून गेला. यंदा पावसाळ्यात पुन्हा या घाटरस्त्याला धोका निर्माण होणार असल्याने त्याचे रूंदीकरण करण्याची गरज आहे. राजकीय इच्छाशक्ती प्रबळ झाल्यास नजीकच्या काळात ऐतिहासिक व पर्यावरण पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे स्वप्न साकारण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू होतील, अशी अपेक्षा आहे.

## बदलते तंत्रज्ञान



### अशा पद्धतीने मिळवा हाय-स्पीड इंटरनेट

आजच्या काळात आपल्या सर्वांना इंटरनेटची गरज आहे. घरी वायफाय बसवता येत असले, तरी सहसा प्रत्येकाच्या स्मार्टफोनमध्ये मोबाइल डेटा असतो, मात्र अनेक वेळा असे घडते की पूर्ण नेटवर्क असूनही फोनमध्ये इंटरनेट येत नाही. आज आपण अशा काही टिप्स जाणून घेणार आहोत ज्या वापरून तुम्ही हाय-स्पीड इंटरनेट मिळवू शकता.


जर स्मार्टफोनमध्ये नेटवर्क पूर्ण असेल, पण तरीही मोबाइल डेटा स्लो असेल किंवा अजिबात काम करत नसेल, तर सर्वप्रथम फोनची कॅशे साफ करा. कॅशे साफ केल्याने तुमच्या फोनची गती वाढते तसेच इंटरनेटदेखील वाढते. याचे कारण म्हणजे सतत मोबाईल ब्राउझर वापरल्याने वेबसाइटचा डेटा कॅशेमध्ये सेव्ह होतो आणि त्यामुळे डेटा आणि फोनचा वेग कमी होतो.

आणखी एक मार्ग आहे ज्याद्वारे तुम्ही तुमचा इंटरनेट स्पीड वाढवू शकता किंवा जर डेटा अजिबात चालू नसेल तर तुम्ही तो चालवू शकता. आपल्या सर्वांच्या स्मार्टफोनमध्ये 'एअरप्लेन मोड' असतो, जो सहसा आपण फ्लाइटमध्ये असतो तेव्हा चालू असतो, पण फोनचे नेट चालू नसल्यासही हा मोड वापरू शकतो. सेटिंगमध्ये जाऊन हा मोड चालू करा आणि काही वेळाने तो बंद करा, फोनचे इंटरनेट फुल स्पीडने चालू होईल.

आणखी एक सोपा मार्ग, ज्याद्वारे तुम्ही तुमच्या फोनचा नेट स्पीड सुधारू शकता तो म्हणजे इंटरनेट पर्याय बंद करणे. तुम्ही फोनचा डेटा काही वेळ बंद करून नंतर काही वेळाने पुन्हा सुरू केला तरीही तुमचा मोबाइल डेटा पूर्ण वेगाने चालू लागतो.

# कान्सच्या व्यासपीठावर 'बनी'चं पहिलं पाऊल!






आपला चित्रपट रसिक प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी चित्रपटाचे निर्माते कलावंत वेगवेगळ्या कल्पक योजना आखतात, ठिकाणं निवडतात. आपलं प्रमोशन इतरांपेक्षा वेगळं असावं, रसिकांनी त्याची दखल घेऊन आपली कलाकृती पहाण्याची उत्सुकता दाखवावी, चार कौतुकाचे शब्द बोलावेत यासाठी हा सगळा प्रपंच सुरू असतो. अशीच एक चमकदार कल्पना आखून निर्माते शंकर धुरी आणि दिग्दर्शक निलेश उपाध्ये यांनी ती प्रत्यक्षात उतरविली देखील.

'आकृती क्रिएशन्स'निर्मित 'बनी' या चित्रपटाचा फर्स्टलूक ७५व्या कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवादरम्यान 'इंडिया पॅव्हेलियन'मध्ये करण्यात आला. या मराठी भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटाची पहिली झलक पाहिल्यावर रसिकांची उत्सुकता शिगेला पोहचली आणि चित्रपटाचे पोस्टर उघडताच प्रेक्षकांनी त्यासोबत सेल्फी छायाचित्रे काढत आपल्या पसंतीची पावती दिली.

आपल्या पहिल्यावहिल्या 'बनी' या चित्रपटाचं आणि प्रसिद्धीचं कॅम्पेन जगप्रसिद्ध कान्स आंतरराष्ट्रीय महोत्सवात करून मराठी चित्रपटांच्या प्रसिद्धीची नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. धुरी हे गेली अनेक वर्ष अनेक यशस्वी चित्रपटांच्या निर्मितीची कार्यकारी धुरा सांभाळत आहेत. नवोदित दिग्दर्शक निलेश उपाध्ये यांच्या सृजनशील विचारांसोबत चित्रपट निर्मितीच्या अनुभवांचं भारदस्त गाठोडं घेऊन पदार्पण करणाऱ्या निर्माते शंकर धुरी यांची 'बनी' ही पहिली कलाकृती असून ती नीट आणि आशयपूर्ण पद्धतीने आपल्या लाडक्या प्रेक्षकांपर्यंत पोहचावी म्हणून त्यांनी कान्सचे

## निमित्त

व्यासपीठ निवडल्याचे म्हटले आहे.

आपला मराठी चित्रपट सीमोल्लंघन करून जगभरातील जिज्ञासू, रसिकांसमोर या पूर्वीच पोहचला आहे. चित्रपटाचा विषय आणि त्याविषयीचं कुतुहल निर्माण करण्याचं काम गेली अनेक वर्ष आपले मराठी चित्रपट चोख करीत आहेत, जगभरातील सुजाण प्रेक्षक आपल्या चित्रपटांचे मनःपूर्वक कौतुक करतात तेव्हा खरा आनंद होतो आणि त्याहून अधिक जेव्हा प्रेक्षक चित्रपटगृहात तिकीट काढून चित्रपट पाहतात असे उद्गार दिग्दर्शक निलेश उपाध्ये यांनी काढले. कान्स सोबत सुरु झालेला हा प्रवास भारतासह जगभरातील इतर मानांकित महोत्सव व पुरस्कारांमध्ये सुरू ठेवणार असल्याचे या महोत्सवाचे क्युरेटर मोहनदास यांनी सांगितले.


**-राम कोंडीलकर**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : मान्सून यंदा लवकर येणार असून दिवसेंदिवस समुद्र खवळत चालला आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारपासून जंजिरा किल्ला बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे हा किल्ला पाहण्यासाठी बुधवारी पर्यटकांनी गर्दी केली होती.** (छाया : नितीन शेडगे)

## आरोग्य प्रहर



### वाढत्या केस गळतीची कारणे आणि उपाय

उन्हाळ्यात हिवाळ्याच्या तुलनेत जास्त केस गळतात. त्याला निश्चित कारणे असल्याचे तज्ज्ञ सांगतात. त्यांच्या मते उन्हाळ्यात आपल्या डोक्यावर घामाचे प्रमाण वाढते. उष्णता, क्लोरिन प्रमाण वाढणे, उन्हाच्या संपर्कामुळे केसांची हानी होते. ते कमजोर, रूक्ष होतात आणि शेवटी गळतात.

उन्हाळ्यात कडक ऊन, प्रदूषण व कोरड्या वातावरणाने डोक्यावरची त्वचाही रुक्ष होते. त्याचा केसांवरही परिणाम होतो. केस कोरडे, कमी चमकदार बनतात. सूर्य आणि उष्ण वाऱ्यांनी आपल्या शरीरावर परिणाम होतो. या काळात आपली पचनशक्ती मंद होते. त्यामुळे शरीरातील उतींचे पुरेसे पोषण होत नाही. त्यामुळे केसांचे कुपोषण होते.

या काळात केसांची काळजी कशी घ्यावी याचा सल्ला तज्ज्ञ देतात. उन्हाळ्यात केस टॉवेलनेच सुकवा. त्यासाठी हेअर 'ड्रायर' वापरू नका. या काळात केसांचा उष्म्याशी फार संपर्क होऊ देऊ नका. केशरचनेसाठी रासायनिक प्रक्रिया करू नका. या काळात केस शक्यतो घट्ट बांधून ठेवावेत. नैसर्गिक तत्त्वे असलेले चांगल्या शाम्पू, कंडिशनरचा वापर करा. रसायनयुक्त उत्पादनांनी केसांचे आणखी नुकसान होते. केसांसाठी खास बनवलेली उत्पादने वापरा. आवळ्याचे तेल वापरा. गरम आवळा तेल व त्याचे मालिश आठवड्यातून एकदा करा. रूक्ष केसांसाठी ते उपयोगी ठरते. केस नियमित कापून त्यातील रुक्ष भाग, मृतप्राय भाग व दुहेरी टोक झालेले भाग कापून टाकावेत. आंघोळीनंतर केसांना टॉवलने जास्त घासू नये. त्यातील पाणी टिपण्यासाठी टॉवेल त्याभोवती बांधून ठेवा. केस थोडे ओलसर असतानाच त्याला सीरम लावा. त्यामुळे त्यात गुंता होणार नाही.

प्रतिबंधक उपाय म्हणून टोपी किंवा रुमाल वापरा त्यामुळे उन्हाने केसांचे नुकसान होणार नाही. केसांसाठीच्या योग्य तेलाने हलक्या हातांनी नियमित मसाज करावा, असा सल्ला तज्ज्ञ देतात.

# कोपरी उड्डाणपुलाला भाजपचा विरोध

## काम थांबविण्यासाठी आमदार गणेश नाईकांचे पालिका आयुक्तांना पत्र

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अरेंजा कॉर्नर ते कोपरी सिग्नल उड्डाणपुलाचे काम रद्द करून अनावश्यक कामांवर जनतेच्या पैशाची उधळपट्टी थांबवा, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबई पालिकेच्या आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे पत्र देऊन केली आहे. या संदर्भात नवी मुंबई भाजपच्या शिष्टमंडळाने आयुक्तांची मंगळवारी (दि. २४) भेट घेऊन या उड्डाणपुलाचे काम त्वरित रद्द करण्याची मागणी केली आहे.





(संग्रहित छायाचित्र)

या उड्डाणपुलासाठी प्रस्तावित असलेल्या ३९० झाडांच्या तोडीला पर्यावरणप्रेमींचा विरोध वाढत आहे. अशातच उड्डाणपुलाचे कंत्राट नियमबाह्य पद्धतीने दिल्याचा आरोप करत आमदार नाईक यांनीही या उड्डाणपुलाला विरोध केला आहे.

राज्यातील सत्ताधारी घटक पक्षाच्या एका बड्या नेत्याच्या दबावाखाली त्याच्या नातेवाईकाला देण्यात आले असल्याचा आरोप आमदार नाईक यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात केला असून हे कंत्राट देताना नियमांचे सर्रास उल्लंघन झाले असून २० टक्के जास्तीच्या रकमेची निविदा मंजूर करण्यात आली आहे, असेही नाईक यांनी सांगत उड्डाणपुलाचे कंत्राटच रद्द करावे, अशी मागणी केली आहे. पालिका आयुक्त बांगर यांची भाजप शिष्टमंडळाने भेट घेत आयुक्तांना गणेश नाईक यांचे पत्र दिले. नवी मुंबई महापालिका नगरसेवकपदाचा कालावधी विसर्जित झाल्यापासून राज्यातील सत्ताधारी घटक पक्षातील एका नेत्याची मर्जी राखण्याकरिता महापालिकेमार्फत अनावश्यक कामे करण्यास प्राधान्य दिले जात आहे. ठराविक प्रभागांमध्येच कोट्यवधी रुपयांची कामे करण्यात आली आहेत, ही अनावश्यक कामे राजकीय दबावाखाली करण्यात येत असून शहरात अनावश्यक कामे करून नवी मुंबईकरांच्या पैशाची लूट करून कोणाला तरी गैरमार्गाने लाभ मिळवून देण्याकरिता हे सर्व सुरू आहे. पामबीच मार्गावरील अरेंजा सर्कल ते कोपरी हा अनावश्यक उड्डाणपूल बांधण्याचे काम घाईघाईत मंजूर करून त्याची वर्कऑर्डर महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे. वाहतुककोंडीचे कारण सांगून पाम बीच मार्गावर उड्डाणपुलाचा घाट घालण्यात आला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभी राहणारी वाहने हटवली तर वाहतुककोंडी निर्माण होणार नाही, असे त्यांनी म्हटले.

या शिष्टमंडळात माजी महापौर सागर नाईक, जयवंत सुतार, सुधाकर सोनावणे, रवींद्र इथापे, दशरथ भगत, डॉ. जयाजी नाथ, निशांत भगत आदींचा समावेश होता.

# पदपथांवरील फेरीवाल्यांवर कारवाई करा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



(संग्रहित छायाचित्र)

**नवी मुंबईकरांची मागणी**

नवी मुंबई शहराचा स्वच्छ भारत स्पर्धेत प्रथम क्रमांक यावा, यासाठी सुशोभिकरणाबरोबरच फेरीवाले व फूड टेम्पो यांच्याकडे पालिकेने गांभिर्याने लक्ष दिले होते. त्यामुळे पदपथ मोकळे झाले आहेत. मात्र हे पदपथ आता पुन्हा भरू लागले आहेत. कारवाई करून पालिकेच्या अधिकाऱ्यांची पाठ फिरली की फेरीवाले पुन्हा आपले बस्तान मांडू लागले आहेत. त्यामुळे पालिकेने गांभीर्याने कारवाई करत पदपथ मोकळे करावेत, अशी मागणी नागरिक करू लागले आहेत.

घणसोली सेक्टर दहा ते हावरे चौकाच्या पुढे व घणसोली रेल्वे स्थानकासमोर, तसेच घणसोली गावाच्या साईमंदिर रस्त्यावरील फेरीवाले पालिकेची कारवाई सुरू असताना पळापळ न करता अधिकृत असल्यासारखे धंदा सुरूच ठेवतात. याबाबत पालिकेने ठोस धोरण आखावे व पदपथ मोकळे करावेत, असे दुकानदारही सांगतात.

पदपथ मोकळे नसल्याने पादचारी मुख्य रस्त्यावरून नाईलाजने चालतात. त्यांना भरधाव वाहनांची भीती असूनही रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागते. याचा पालिका विचार करणार आहे की नाही, असा सवाल पादचारी करत आहेत.

**महापालिकेच्या वतीने वेळोवेळी कारवाई करण्यात येते. आमची कारवाई झाली की पुन्हा फेरीवाले व्यवसाय सुरू करतात.**

**–महेंद्रसिंग ठोके, विभागीय अधिकारी, घणसोली**

# उरणमध्ये पूर्वमोसमी पावसाच्या सरी

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील काही भागात मंगळवारी सकाळी मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्याने हवेत गारवा निर्माण झाला होता, मात्र त्यानंतर काही प्रमाणात उकाडाही सुरू झाल्याने याचाही त्रास नागरिकांना सहन करावा लागला.

सोमवारी तापमानात वाढ झाली होती. गेले काही दिवस सायंकाळी पावसाचे वातावरण निर्माण होत होते, मात्र पाऊस कोसळत नव्हता. मंगळवारी सकाळी आठ वाजता व त्यानंतरही उरण शहर, नागाव, केगाव परिसर आदी भागात काही प्रमाणात मोसमीपूर्व पावसाच्या सरींनी शिडकावा केला. यामुळे काही काळासाठी हवेत गारवा निर्माण झाला होता. त्यानंतर पुन्हा एकदा उन्हाचा तडाखा जाणवू लागल्याने वातावरण तप्त झाले होते.



# उत्पादन घटल्यामुळे टोमॅटो महागले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

देशभर टोमॅटोचे उत्पादन घटल्यामुळे बाजारभाव वाढू लागले आहेत. मुंबई बाजार समितीमध्ये टोमॅटोचे दर ४० ते ८० रुपयांवर पोहोचले असून, किरकोळ मार्केटमध्येही भाव ९० ते १०० रुपये झाले आहेत.



भाजीपाल्यामध्ये सर्वाधिक मागणी असलेल्या टोमॅटोची असते. मुंबईकरांच्या आवडीची पावभाजी, सॅलॅड व सर्वसामान्य नागरिकांच्या आहारातही टोमॅटोची भाजी नियमित केली जाते. त्यामुळे वर्षभर टोमॅटोची मोठ्या प्रमाणात मागणी असते. मुंबईत सातारा, पुणे, नाशिकसह दक्षिणेतील राज्यांमधूनही टोमॅटोची आवक होत असते; परंतु पंधरा दिवसांपासून कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडूमध्ये टोमॅटोची कमतरता निर्माण झाली आहे. तेथेही महाराष्ट्रातून टोमॅटो पाठविला जात आहे. मागणीच्या तुलनेत उत्पादन कमी होत असल्यामुळे बाजारभाव वाढू लागले आहेत. मुंबई बाजार समितीमध्ये एक महिन्यापूर्वी १४ ते २२ रुपये किलो दराने टोमॅटो विकला जात होता.

एक आठवड्यापूर्वी हे दर २५ ते ६० रुपये झाले व सोमवारी बाजारभाव ४० ते ८० रुपयांवर गेले आहेत. किरकोळ मार्केटमध्ये ९० ते १०० रुपये दराने टोमॅटोची विक्री होत असून, त्यामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे.

# ‘भाडिपा रोजगार’चा ट्रेलर लॉन्च

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भाडिपा रोजगार या मराठी वेब सिरीजच्या कलाकारांचा ट्रेलर नुकताच येथील पिल्लई कॉलेज कॅम्पसमध्ये लॉन्च करण्यात आला. या वेळी प्रमुख अभिनेत्री सई ताम्हणकर हिने सहकारी अभिनेते संभाजी ससाने आणि जगदीश कनोम सोबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

भाडिपा ही शॉर्ट फॉर्म असून भारतीय डिजिटल पार्टी हे एक प्रसिद्ध मराठी युट्युब चॅनेल आहे ज्याने फेसबुक आणि युट्युब वर दीडशे दशलक्षाहून अधिक व्ह्यूज मिळवले आहेत. ते कॉमेडी आणि म्युझिक व्हिडिओसारखी सामग्री तयार करते त्यांची आगामी वेबसिरीज बीई रोजगार ह्या फिल्म मध्ये तीन अभियंते अपवादात्मक रस्ते घेतात आणि स्वतःचा मार्ग स्वतः तयार करतात याबद्दलची कथा आहे.



या कार्यक्रमाची सुरुवात मंदार भिडे यांच्या मराठी स्टॅन्ड अपने झाली. प्रेक्षकांशी साधलेला संवाद सई ताम्हणकरने तिच्या आणि तिच्या आगामी कार्यासाठी प्रेरक ठरेल असे सांगितले. या वेळी सहकलाकार ससाने आणि जगदीश कन्नम या दोघांनीही प्रेक्षकांशी संवाद साधला. आणि वेबसीरीज मध्ये काम करतानाचा अनुभव सांगितले.

# भेंडखळ येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

## कै. रोहिदास घरत यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपक्रम

**उरण : बातमीदार**

भेंडखळ येथे कै. रोहिदास महादेव घरत यांच्या प्रथम पुण्यस्मरण प्रित्यर्थ प्रकल्पग्रस्त संघटना भेंडखळमार्फत प्राथमिक शाळा भेंडखळ येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कै. रोहिदास घरत यांच्या कामगार व सामाजिक क्षेत्रातील कामांचा यावेळेस गुणगौरव सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणात केला. त्यांच्या पश्चात त्यांचे सामाजिक व प्रकल्पग्रस्तांसाठीच कार्य पुढे नेणार असल्याच या वेळी प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष अनिल अशोक ठाकूर यांनी सांगितले. या वेळी या कार्यक्रमास प्रमुख



उपस्थिती म्हणून लाभलेले पालवी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष परशुराम भोईर, चंद्रविलास घरत, सामाजिक कार्यकर्ते नासिकेत म्हात्रे यांनी कै. रोहिदास घरत यांच्या सामाजिक व कामगार क्षेत्रातील कार्याबद्दल विस्तृतपणे आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात कै. रोहिदास घरत यांच्या पत्नी हर्षदा घरत व त्यांच्या दोन्ही मुली यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक पाटील, विकास, सर्व शिक्षक वर्ग, भेंडखळ गावचे माजी सरपंच मनोज भगत, माजी उपसरपंच मिलींद पाटील, योगेश भगत, प्रकल्पग्रस्त संघटनेतर्फ अनिल ठाकूर, लिलेश्वर भगत, निलेश पाटील, शक्ती पाटील, अक्षय भोईर, संदीप म्हात्रे, रूण्मय म्हात्रे,प्रशांत पाटील, किरण घरत, सचिन पाटील तर सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, कविश ठाकूर, अमेश ठाकूर, प्रांजल भोईर, संतोष पाटील, दर्शन पाटील, ओंकार पाटील, अदित्य पाटील, स्वप्नील घरत, उमेश ठाकूर, महेश भोईर, अशोक ठाकूर व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोहोप येथे मोफत नेत्रचिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहोप येथे आयोजित करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

उमा मुंढे, गणेश काळे, प्राथमिक आरोग्य केंद्र वरिष्ठ डॉ. सीमा पाईकराव, ईसांबे ग्रामपंचायतीचे उप सरपंच अनंता पाटील, सेक्रेटरी संदीप साबळे, डॉ. पाटील यांनी दिपप्रज्वलित करून शिबिराची सुरुवात केली. ओपीडी ७८ तर मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी १७ पेशंट हॉस्पिटलला पाठविण्यात आले.

रायगड जिल्हा परिषदेतून सन्मतीपत्र आणून शिबिराच्या



सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत थांबून शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य उमा मुंढे यांचे लाभले. माजी सरपंच बबन पाटील, वडगाव ग्रामपंचायतीचे नंदू पाटील, शारदा काळे, वर्षा पाटील, धनंजय गीध, सहा. सेक्रेटरी देवेंद्र महिंद्रकर, कल्पेश गीत, सुनील कूरुप, बाळकृष्ण होनावळे, अनुराधा होनावळे, अॅनेट मनस्यू कुरुप, अमित शाह, रोटरॅक्ट अध्यक्ष रोहन गावडे, अनिल सैनी, शंकरा हॉस्पिटल स्टाफ, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वरीष्ठ डॉ. रोकडे सर्व नर्स व स्टाफ, आशा वर्कर्स यांची उपस्थिती लाभली.

# उष्मघाताचा फटका बसलेल्या घारीला जीवदान

**नवी मुंबई : बातमीदार**

उष्मघातामुळे व वाढत्या उकाड्यामुळे मानव जातीलाच नाही तर पशु-पक्ष्यांनादेखील मोठ्या झळा बसत आहेत. याच परिस्थितीमध्ये नवी मुंबई महापालिकेच्या नेरूळ-बी-विभाग कार्यालयातील कर्मचारी संतोष मनोरे यांना एक घार जखमी अवस्थेत विभाग कार्यालयाच्या आवारात आढळून आली.

मनोरे यांनी पक्षीप्रेमी तथा सर्पमित्र दीपक गायकवाड यांच्याशी फोनद्वारे संपर्क करून याबाबतची सविस्तर माहिती दिली. सर्पमित्र दीपक गायकवाड यांनी ताबडतोब त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. त्या घरीला योग्य रीतीने हाताळत तिला खाऊ पिऊ घालत तिचे प्राण वाचवले, तसेच सुःखरुप रित्या सोडून देण्यात आले.

ही घार जमिनीवर कोसळून बेशुद्धावस्थेत पडलेली होती. दीपक गायकवाड यांनी ताबडतोब या घारीला अलगद उचलून पाहणी केली. कोणती जखम तिच्या अंगावर आहे का याची



तपासणी केली त्यावेळी तिला उष्माघाताचा फटका बसल्याचे आढळून आले. घार पडल्याने कावळेदेखील जमा झाले होते. जर वेलेव उपचार मिळाले नसते तर कावळ्यांनी देखील चोची मारून घरीचा मुत्यू ओढवला असता. दीपक गायकवाड यांनी तातडीने या घारिला सुखरूपणे हाताळत तिच्यावर प्राथमिक उपचार केले. तिच्या अंगात व पंखात बळकटी येईपर्यंत तीन-चार दिवस आपल्या निगराणीत ठेवले. दरम्यान, तिला दररोज व्यवस्थित खाऊ पिऊ घालण्यात आले. काही दिवसांत घारिला ताकद मिळाल्याचे दिसून आल्यावर तिची पुन्हा तपासणी केली. हा घार जातीचा पक्षी पूर्णपणे बरा झाल्यानंतर त्याला पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून त्याला जीवदान देण्यात आले.

या कार्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या बी-विभाग कार्यालयाच्या वतीने व नागरिकांच्या वतीने सर्पमित्र तथा पक्षीप्रेमी दीपक गायकवाड यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या वेळी नागरिकांना पाळीव प्राणी, पक्षी व सापांविष्यी जनजागृती करण्यात आली. पक्ष्यांसाठी नागरिकांनी पाणी व खाद्य असलेली भांडी का ठेवावी हे कारण पटवून देण्यात आले. नागरिकांनी भांडीदेखील वाटण्यात आली.

**नागरिकांनी आपल्या घराच्या छतावर व मोकळ्या जागेवर या मुक्या प्राणी पक्षासाठी थोडासा चारा पाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. मुक्या पशुपक्षी प्राण्यांचे रक्षण करा. निसर्ग तसेच पर्यावरण वाचवा असे आवाहन करण्यात आले.**

**–दीपक गायकवाड, सर्पमित्र तथा पक्षीप्रेमी**

# पनवेलमध्ये काव्य संगीत कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या सिटीझन्स युनिटी फोरमच्या वतीने (कफ) पनवेल संवादमालेत महाराष्ट्रातील प्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर यांचा काव्य संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक सभागृहामध्ये रविवारी (दि. २९) सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार असून हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहे.

आत्तापर्यंत कफच्या पनवेल संवादमालेत ५०च्या आसपास व्याख्याने झाली आहेत. कफच्या पुढाकाराने पनवेलकरांच्या सहकार्याने बाबा आमटे यांच्या आनंदवन प्रकल्पाला जवळजवळ ४० ते ५० लाख रुपये आर्थिक मदत करण्यात आली आहे. त्याचबरोबर आरोग्य शिबिरे, डोळे तपासणी शिबिरे आणि फणसवाडी येथे आठ हजार झाडे कफतर्फे लावण्यात आली आहेत.

# बेलापूरमधील बहुमजली वाहनतळ प्रगतिपथावर

## आयुक्तांकडून प्रकल्पस्थळांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत विविध प्रकल्प कामे सुरू असून सदर कामांची सद्यस्थिती जाणून घेणे व त्या कामांना गती देणे यादृष्टीने महापालिका आयुक्त अभिजित बांगर विविध प्रकल्प स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करीत आहेत. बुधवारी (दि. २५) आयुक्तांनी सेक्टर १५ सीबीडी बेलापूर येथील बहुमजली वाहनतळ बांधकामाची तसेच वंडर्स पार्क, सेक्टर १९ नेरूळ येथे सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. या ४ मजली बहुमजली वाहनतळात ४७६ चारचाकी वाहने व १२१ दुचाकी अशी एकूण ५९७ वाहने पार्कींग करण्यासाठी सुविधा उपलब्ध असणार आहे.

सेक्टर १५ बेलापूर येथील भूखंड क्रमांक ३९ याठिकाणी चार मजली बहुमजली वाहनतळ विकसित करण्यात येत आहे. सद्यस्थितीत तीन स्लॅबचे काम पूर्ण झाले असून आयुक्तांनी संपूर्ण बांधकामाची पाहणी केली. वाहनतळाच्या पाहणीअंती आयुक्तांनी जानेवारीपर्यंत काम पूर्ण होईल अशा दृष्टीने नियोजनबद्ध काम करावे असे निर्देश दिले. त्याचप्रमाणे पावसाळी कालावधीत पावसाचे पाणी आत येऊ नये याची काळजी घेण्याच्या तसेच आतील भागात पुरेशा प्रमाणात नैसर्गिक प्रकाश राहील यादृष्टीने व्यवस्था करण्याच्या सूचना केल्या.

या वाहनतळामध्ये प्रवेश करण्यासाठी कै. नागा गणा पाटील उद्यानासमोरून पूर्व दिशेने प्रवेशद्वार असून पश्चिमेच्या दिशेने वाहने बाहेर जाण्याचे प्रवेशव्दार आहे. या ४ मजली बहुमजली वाहनतळात ४७६ चारचाकी वाहने व १२१ दुचाकी वाहने पार्कींग करण्यासाठी सुविधा उपलब्ध असणार आहे. यासोबतच सेक्टर १९ नेरूळ येथील वंडर्स पार्क हे नवी मुंबईकर नागरिकांप्रमाणेच नवी मुंबईला भेटी देणाऱ्या इतर शहरांतील नागरिकांचे व पर्यटकांचेही आकर्षण केंद्र असून त्याच्या नुतनीकरणाचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे.

### नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे निर्देश

**पाहणीदरम्यान आयुक्तांनी तेथील अत्याधुनिक खेळणी (राईड्स) व्यवस्थितरित्या बसविली जातील याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देश अभियंत्यांना दिले. त्याचप्रमाणे या राईड्सवर खेळणाऱ्या नागरिकांची सुरक्षा राखली जाण्याच्या दृष्टीनेही संपूर्ण खबरदारी घेतली जावी याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देशित केले. वंडर्स पार्क हे अत्यंत लोकप्रिय असे मनोरंजनाचे ठिकाण असून तेथील प्रत्येक सुविधा ही त्या दर्जाची राहील याची विशेष काळजी घेण्याचे आयुक्तांनी सूचित केले.**



(प्रातिनिधिक छायाचित्र)



# खालापूर तालुक्याला पाणीटंचाईची झळ

## काही गावे, वाड्यांना टँकरने जलपुरवठा; कायमस्वरूपी उपाययोजना आवश्यक



(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

तीन धरणांचा आणि बारमाही वाहणाऱ्या नदीचा खालापूर तालुक्यात काही ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला असल्याचा दावा प्रशासन करीत आहे. दरवर्षी तीच गावे टंचाईग्रस्त गावांच्या यादीत दिसून येत आहेत. प्रशासन कागदी घोडे नाचविण्यात अग्रेसर असल्याचे टंचाईग्रस्त गावातील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सध्या पाच गाव आणि चार वाड्यात टँकरची पाणीवारी सुरू आहे. यंदाच्या टंचाई आराखडा तयार करताना २४ लाख ७५ हजार रूपये निधीची तरतूद करण्यात आली होती. टंचाई निवारण कृती आराखड्यात १८ गावे आणि ४४ वाड्यांचा समावेश करण्यात आला होता. नवीन विंधन विहिर घेणे, टँकरने पाणीपुरवठा करणे, पूरक नवीन पाणी जलवाहिनी घेणे आणि विहिर घेणे आदी उपाययोजना प्रस्तावित होत्या. टँकर किंवा बैलगाडीने पाणीपुरवठा करणे यादित १७ गाव आणि ३५ वाड्या समाविष्ट होत्या, मात्र टंचाईची तीव्रता कमी जाणविल्याने एप्रिल अखेर टँकरची गरज पडली असून पाच गाव आणि चार वाड्यात सध्या टँकर रोज धावत आहे. दरम्यान २०२०-२१ ला २७ गावे ३९वाड्या टंचाईग्रस्त यादीत होत्या. त्यासाठी पाऊणकोटीची तरतूद होती.

> **आयत्यावेळी नव्याने गावे किंवा वाड्या समाविष्ट करण्यात अडचण होती. त्यासाठी प्रस्ताव करताना अगोदरच गाव आणि वाडी यांची संख्या अधिक घेऊन तरतूद करण्यात आली आहे.**
> **-बालाजी पुरी, गटविकास अधिकारी खालापूर पंचायत समिती**

| टंचाईग्रस्त गावे | लोकसंख्या |
|---|---|
| वावोशी | १४९० |
| इसांबे | ४३३ |
| उसरोली | ५९५ |
| चिलठण | ६५० |
| उजळोली | २३६ |
| खानाव | ६९७ |

| टंचाईग्रस्त वाड्या | लोकसंख्या |
|---|---|
| चिलठण (बुद्धभूषण नगर) | १२९ |
| उजळोली (आदिवासीवाडी) | १४४ |
| खानाव (आदिवासीवाडी) | ४६४ |
| खडई वाडी | १४२ |

# नेरळ रेल्वेस्थानकात पादचारी पुलाचा पिलर कोसळला

### मोठा अपघात टळला

**कर्जत : बातमीदार**

नेरळ रेल्वे स्थानकात असलेल्या जुन्या पादचारी पुलाचे पिलर तोडताना ते अचानक कोसळले. सुदैवाने मोठा अपघात टळला आहे. त्यावेळी ते सिमेंटचे पिलर रेल्वे मार्गावर कोसळले असते तर मोठा अनर्थ ठरला असता. दरम्यान, याबाबत मध्य रेल्वे कडून कोणतीही जबाबदारी स्वीकारली जात नाही. मध्य रेल्वेकडून गेले अनेक दिवस या जुन्या पादचारी पूलाचे पिलर तोडण्याचे काम सुरु होते.

नेरळ रेल्वे स्थानकात २००३ मध्ये पादचारी पूलाचे काम सुरु झाल. त्यासाठी स्थानकात मध्यभागी दोन्ही व बाजूला पिलर उभारले गेले होते. त्या पिलरवर टाकण्यासाठी लोखंडी प्लेट देखील नेरळ स्थानकात येऊन पडल्या होत्या. मात्र मध्य रेल्वेने त्या पादचारी पूलाचे काम थांबवून ठेवले आणि तब्बल २० वर्षांनी ते दोन्ही पिलर काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार फलाट दोन वरील पिलर गेले दिड महिना काढले जात होते. त्या पिलर चा २० फूट उंचीचा भला मोठ्या व्यासाचा खांब २४ मे रोजी अचानक कोसळला. त्यावेळी हा पिलर रेल्वे मार्गावर कोसळला असता तर मोठा अनर्थ घडला असता. दैव बलवत्तर म्हणून हा पिलर ओव्हर हेड वर कोसळला आणि अनर्थ टळला आहे. दरम्यान, संभाव्य दुर्घटना घडली असती तर काय झाले असते?याचा विचार रेल्वे प्रशासनने करण्याची गरज असून तो धोका लक्षात असून देखील खबरदारी न घेणाऱ्या कंत्राटदार यावर कारवाई करणार आहे की नाही? असा प्रश्न नेरळ प्रवासी संघटनेने उपस्थित केला आहे.

### घटनेनंतर रेल्वे प्रशासन गप्प

***अचानक कोसळलेल्या या पिलरबाबत मध्य रेल्वेकडून कोणतीही माहिती दिली जात नाही. त्याचवेळी तो पिलर रेल्वे मार्गावर कोसळला असता तर मुंबईकडे आणि कर्जतकडे जाणारी सर्व वाहतूक बंद पडली असती. त्यात तो पिलर मजबूत असल्याने कदाचित ओव्हर हेड खांब कोसळल्याची आणि पूर्ण रेल्वेमार्ग बंद होण्याची देखील भीती होती, मात्र या दुर्घटनेबाबत मध्य रेल्वे गप्प बसल्याचे दिसून येत आहे.***



## मुंबई-गोवा महामार्गावर पादचाऱ्याला उडविले

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर वाशी नाका येथे रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यास भरधाव एसटी बसची धडक बसून या अपघातात पादचारी बबन तुळशीराम विरकर रा. बहिराम कोटक हे गंभीर जखमी झाले आहेत.

अधिक माहिती अशी, फिर्यादी राहुल दशरथ मंजुळे रा.बहीरम कोटक पो.वाशी, ता.पेण मूळ रा. लामजना, लातूर, यांचे काका हे बुधवारी (दि. २४) रात्री ८.४५च्या सुमारास वाशीनाका येथे अण्णा टायरवाला समोरील हॉटेलमध्ये पाणी आणण्याकरीता पायी चालत चालत जात होते. तेथून ते पाणी घेवुन पुष्पक हॉटेलच्या समोरील मुंबई-गोवा हायवे रोडवर पायी चालत रस्ता ओलांडताना अचानक वडखळ बाजूकडून भरधाव येणारी एसटी बसची त्यांना धडक बसली. बबन विरकर यांच्या डोक्यास मार लागुन ते गंभीर जखमी झाले.

याबाबत पेण पोलीस ठाणे येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास महिला पोलीस नाईक कांबळे या करीत आहेत.

## अंतोरे फाटा येथे बंद पडलेल्या एसटीमधून इटीआय मशिन चोरीस

**पेण : प्रतिनिधी**




पेणमधील अंतोरे फाटा येथे बंद पडलेल्या एसटी बसमधून अज्ञात चोरट्याने तिकीट काढावयाचे ईटीआय मशीन चोरून नेल्याची घटना घडली आहे.

एसटी वाहक नानासाहेब सोपान भोसले रा.काजुवाडी पो.खारगाव ता.रोहा हे त्यांच्या ताब्यातील मुंबई ते रोहा एसटी बस (क्र.एम एच २० बी एल ३१९४) ही मंगळवारी (दि.२३) रात्रौ ९.१५ च्या सुमारास वाहक म्हणून ड्युटी बजावित असताना पेणमधील अंतोरा फाटा येथे बस आली असता ती बंद पडली. ही बस चालू करण्यासाठी ते चालकास मदत करण्यासाठी बसमधून उतरले. यावेळी त्यांनी आपल्या ताब्यातील एकूण चार हजार रुपये किमतीची तिकिट फाडायची इटीआयएम मशीन त्यांच्या शीटवर ठेऊन ते उतरले होते. या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या हेतुने ती मशीन चोरून नेली. पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पो.ह. जाधव हे करीत आहेत.

## कर्जतमध्ये महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

**कर्जत :** महाराणा प्रतापसिंह यांना कर्जत नगर परिषदेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. या वेळी नगरसेवक राहुल डाळिंबकर, कार्यालयीन अधिक्षक जितेंद्र गोसावी, मनीष गायकवाड, रवींद्र लाड, अविनाश पवार, रुषिता शिंदे, शेखर लोहकरे, सुदेश गायकवाड, सामिया चौगुले आदी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. जोमा शंकर गायकर, श्रीमती भागुबाई नामदेव म्हात्रे, श्रीमती द्वारकाबाई नामदेव माळी, कै. गठू शंकर गायकर मयतचे वारस श्रीमती जनाबाई गठू गायकर, श्री. बळीराम गठू गायकर** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे - केवाळे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २८/अ | ०-३१-६० <br> पो.ख. ०-०२-८० <br> **एकूण ०-३३-४०** | ७.२५ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २५/०५/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. सुभाष दत्ता भौमिक** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे - अजिवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ९९/१ | ०-१७-५० | ३.८९ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २५/०५/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000023367** <br> **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-27/2022-2023** <br> Rfx e-tender for Providing additional jumper (T-Clamp with jumper cone) to avoid breaking of jumper during critical load condition of 100kV Apta- Bhokarpada Line under EHV Lines S/Dn. Panvel under EHV (O&M) Division Panvel. <br> **Tender amount Rs. 12,22,514/-, EMD amount Rs. 12,225/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **26.05.2022, 17:00 Hrs. to 02.06.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 02.06.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **03.06.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000023368** <br> **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-28/2022-2023** <br> Rfx e-tender for work of Creation of New earth pit for Transformers at various substation and renovation of earth mesh at 22kV Yard at 220kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel. <br> **Tender amount Rs. 16,45,925/-, EMD amount Rs. 16,459/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **26.05.2022, 17:00 Hrs. to 02.06.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 02.06.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **03.06.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

### पनवेल महानगरपालिका
### पाणी पुरवठा विभाग
### "नागरिकांना जाहीर आवाहन"

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२२/प्र.क्र. १४९/१९९/२०२२ दिनांक :- २५/०५/२०२२

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहरामध्ये दि. १०/०२/२०२२ रोजीपासून जलकुंभनिहाय आठवड्यातून एका भागाचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत देहरंग धरणाची पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पनवेल शहरामध्ये शनिवार दि. २८/०५/२०२२ रोजी पासून ते देहरंग धरणात मुबलक पाणीसाठा होईपर्यंत झोननिहाय एकदिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

खालील भागात दिनांक २८/०५/२०२२ रोजी पासून एक दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येईल.

**झोन क्र. १ मधील भाग पुढीलप्रमाणे**

**१) पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा :**
कोळीवाडा, पांजरपोळ, वाणी आळी, धोबीआळी, मिरची गल्ली, कुंभार वाडा (अर्धा) मेवाड हॉटेल ते टपाल नाका भारत नगर झोपडपट्टी, पटेल मोहल्ला, सत्कार बेकरी ते कछवा प्लाझा, अप्सरा लॉन्ड्री ते मुस्लीम नाका, भुसार मोहल्ला, कुंभार वाडा (अर्धा), धोबी आळी, पाडा मोहल्ला, कच्छी मोहल्ला, पाटकर वाडा, आदिल टॉवर ते वाली अपार्टमेंट, ख्वाजानगरी झोपडपट्टी बंदर रोड, कोर्ट ते प्रेस्टीज गार्डन (साई नगर) आदर्श सोसायटी, किनारा सोसायटी ते स्वामी नारायण मंदिरापर्यंत इत्यादी.

**२) सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा :**
मिडल क्लास सोसायटी भाग १, आमदार निवास गल्ली प्लॉट नं. ११ ते आशापुरी सोसायटीपर्यंत, विश्राली तलाव झोपडपट्टी, विश्राली तलाव ते पंजाब हॉटेल पेट्रोलपंपपर्यंत, विश्राली नाका ते पंजाब हॉटेल मिडल क्लास सोसायटी भाग २, गांधी हॉस्पिटल ते जे. जे. वूडपर्यंत, बार्नस हायस्कूल ते प्लॉट नं. १४ (रायगड बँक) प्लॉट नं. ६४ ते श्रवरजंली सोसायटी (एम.टी.एन. एल.च्या मागील गल्लीपर्यंत) प्लॉट नं ३६ ते रुपाली टॉकीजपर्यंत काशीबाई झोपडपट्टी, बालाजी सोसायटी, निळकंठ दर्शन, देव गौरव, लिलामाधव, पनवेल पॅलेस, ओरियन मॉल, इत्यादी.

**३) गंगाराम टॉकिज उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा :**
तक्का गाव संपूर्ण, प्रजापती, कावेरी, सुर्य गेस्ट हाऊस, एन. के. हेरीटेज, रिद्धी सिद्धी, निल सिद्धी गार्डन, इडन गार्डन, गोदरेज, नवनाथ मंदिर झोपडपट्टी, आझाद नगर झोपडपट्टी, सारंग लॉज ते साई मंदिर, संपूर्ण पोदी, कस्तुरी ABC सोसायटी, कस्तुरी AA, BB, कस्तुरी EFG, नॅशनल प्लाझा, नॅशनल रेसिडेंसी, नॅशनल गार्डन, मोराज छोटा गेट, नॅशनल पॅराडाईज, नॅशनल ABC कॉस्मो, मोराज M.A., मोराज गंगा, जमुना, मोराज गंगोत्री, एस. के. बजाज, बालाजी अंगण, निरज माधव, निळकंठ दर्शन, साळवी रेसीडेन्सी, नॅशनल D विंग, कॉस्मो पॉलिटीन सोसायटी, नॅशनल पॅलेस ABC, एम एस ई बी कॉलनी, कांडपिळे रेसिडेन्सी, नॅशनल पॅलेस नविन लाईन, गोदरेज, मोराज MA - १, To MA - ४, मोराज T१, T२, T३, T४, मोराज S१, S२, S३, S४, मोराज T५, T६, T७, मोराज T४, T५, T६, मोराज R१, R२, R३, मोराज R४, R५, R६, मोराज PN Type, मोराज तापी, नर्मदा, मोराज L४, L५, मोराज.

**४) मार्केट यार्ड उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा :**
उरण रोड ते शंकर मंदिर कोळीवाडा, उरण रोड ते ताज सोडा फॅक्टरी, बागवान मोहल्ला, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते वसंत आलाप सोसायटी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते साईप्रतिक सोसायटी, मार्केट यार्ड परिसर, वैभव हॉटेल, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते हिबा सोसायटी, रजदा सोसायटी, मुल्ला हमिद मंजिल सोसायटी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते गुरूशरणम, रॉयल रेसिडेन्सी सोसायटी मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते पारिजात सोसायटी गुलमोहर, गुलिस्तान सोसायटी, पंचमुखी, फ्युचर हाईट, चिन्मय गोरांग सोसायटी, गोविंद धाम, तिरूपती ए.एम.एस. हेरीटेज सोसायटी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते लिखिते हॉस्पिटल परिसर इत्यादी.

**झोन क्र. २ मधील भाग पुढील प्रमाणे**

**१) सर्व्हिस हौद जुने चौकोनी जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा :**
माणिक नगर, स्नेहसदन सोसा., येशोदिप सोसा., पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय, जैन मंदिरपासून भुसार मोहल्ला बैठी घर, पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रॉनिकपर्यंत, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिरापर्यंत, लक्ष्मीवसाहत, शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरीपर्यंत, अशोका गार्डन सोसा., मेवाड हॉटेल ते मशीदपर्यंत, अर्बन बँक ते साई पार्क, अर्बन बँक ते गणपती परिसर, श्री. गांगल यांच्या घरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेलपर्यंत घाटे आळी, गावदेवी परिसर, गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेसपर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा.पर्यंत, गावदेवी पाडा भाग, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल, दांडेकर हॉस्पिटल ते अच्युत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटलपर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे, घोडके आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्या घरापर्यंत, जय भारत नाका ते बैठी घरे पर्यंत जैन मंदिरपर्यंत, आदर्श हॉटेल ते अदित्य कॉम्पलेक्सपर्यंत मनिष मार्केट, जय भारत नाका ते रतन टॉकिजपर्यंत, त्रिमुर्ती सहनिवास सोसा., मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी, साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटीपर्यंत, सिटी स्टोअर्स गल्ली, सिनियर ज्युनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटलपर्यंत, गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा. ते सहयोग नगरपर्यंत, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटीपर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धनपर्यंत, आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंटपर्यंत, कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगरपर्यंत, मुनोथ नगर ई विंग, प्रिन्स पॅराडईज सोसा., सनराईज सोसा., केशव सोसायटी, भाऊ पटवर्धन ६ पाईपलाईन, नवीन प्रभु आळी, हिरवे गुरूजी पुतळा ते वडाच्या झाडापर्यंत, जुनी प्रभुआळी, हारवाला, कुलकर्णी बाजू, मेन व्हॉल, अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींगपर्यंत, गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटीपर्यंत, रचना रेसिडेन्सी सोसा., अष्टविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत, श्री लॉज मे. निलेटा गार्डनपर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराजपर्यंत, यशोपुरम सोसा. आगरी समाज हॉल ते व्हि.के. हायस्कूलपर्यंत, जुने पोस्ट ते डॉ. बुधकर दवाखान्यापर्यंत, अंबिका नगर, इत्यादी.

**२) हरिओम नगर बायपास व ठाणा नाका उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा :**
जानवेकर परिसर, सावरकर चौक ते रतन टॉकीजपर्यंत अशोक बाग झोपडपट्टी, लोखंडी पाडा, हरि ओम नगर, हरिओम नगर टाकी ते प्रतापनगरपर्यंत, प्रताप नगर ते सुजाता सोसायटी, भाग १-संघ मित्र सोसायटी, दत्त छाया, पारिजात, साईपार्क, पायोनियर, सत्यम शिवम सुंदरम, रुपल सोसायटी, बालाजी पद्मावती, समाधान बंगला, भाग २ मॉर्डन सोसायटी, रिद्धी-सिद्धी सहकार निवास, राजहंस सोसायटी, गुल मोहर, निसर्ग देव, जय माता दी, प्रधान बंगला, सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, तालुका पोलीस वसाहत, अनुपम सोसायटीपर्यंत, गोविंद गार्डन, गार्डन हॉटेल, शिव सागर हॉटेल, प्रधान बंगला शिवनेकर बंगला व पाटील हॉस्पीटल परिसर, डॉ. बिरमोळे हास्पीटल, नंदनवन, कॉस्मो पॉलिटियन, कनक सरोवर, मधुबन सोसा., स्वप्न रेखा सोसा., साकेत सोसा., पंकज व्हिला, सेलटन सोसा. (उरणकर) मनिषा अपार्टमेंट, गजानन सोसा. एच.ओ.सी. कॉलनी, जलकुंभ ते ठाणा रोड दर्ग्यापर्यंत ५२ बंगला (काही भाग), आनंद सोसायटी व परिसर, उगम नगर परिसर, पवार गल्ली, चॅनल, उपवन, ऑरचिड सोसायटी, लोटस लिली, गोविंद सागर, साईकला, साई विहार, ठाकूर बंगला, साई उद्यान, लामेर सोसा., अप टाउन रिव्हेन्यू सोसा., साई नगर परिसर, भुसरा पार्क, एकता सोसायटी ते गुरु वाटीका इ. तेरडे बिल्डिंग, जलकुंभ ते ठाणा रोड दर्ग्यापर्यंत ५२ बंगला (काही भाग).

**३) भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा :**
कर्नाळा सर्कल ते रुपाली टॉकीज, कर्नाळा सर्कल ते शनी मंदीर ते रोहिदास वाडा, शनि मंदीर ते पंचरत्न हॉटेल ते विश्राळी नाका, पंचरत्न हॉटेल ते डॉ. हळदीपूरकर हॉस्पीटल, शनि मंदीर ते मिरची गल्ली नाका, आशापुरी सोसायटी इत्यादी.

वरील झोनप्रमाणे झोन क्र. १ मध्ये दिनांक २८/०५/२०२२ रोजी पाणीपुरवठा होईल व झोन क्र. २ मध्ये दिनांक २९/०५/२०२२ रोजी पाणीपुरवठा होईल. या प्रमाणे पुढे क्रमश: दिवसाआड पाणीपुरवठा होईल.

नागरिकांनी मिळालेले पाणी साठवून ठेवून जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय करू नये व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**सही/-**
**संजय जगताप**
**(शहर अभियंता)**
**पनवेल महानगरपालिका**

# गुजरातची अंतिम फेरीत धडक

## आयपीएलमध्ये राजस्थानवर मात; मिलर, हार्दिक विजयाचे शिल्पकार

**कोलकाता : वृत्तसंस्था**

डेव्हिड मिलर (३८ चेंडूंत नाबाद ६८ धावा) आणि कर्णधार हार्दिक पांड्या (२७ चेंडूंत नाबाद ४०) यांच्या दिमाखदार खेळींमुळे गुजरात टायटन्सने मंगळवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमधील 'क्वॉलिफायर-१'च्या सामन्यात राजस्थान रॉयल्सवर सात गडी राखून विजय मिळवला आणि अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. राजस्थानने गुजरातसमोर विजयासाठी १८९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. गुजरातने ही धावसंख्या शेवटच्या षटकात गाठली.



कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर झालेल्या या लढतीत राजस्थानने विजयासाठी दिलेल्या १८९ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या गुजरातची खराब सुरुवात झाली. गुजरातचा सलामीवर वृद्धीमान साहा पहिल्याच षटकात एकही धाव न करता झेलबाद झाला. त्यानंतर सलामीला आलेल्या शुभमन गिल आणि मॅथ्यू वेड या जोडीने चांगली खेळी केली. या जोडीने ७२ धावांची भागिदारी केली ज्यामुळे गुजरातचा डाव सावरला, मात्र संघाच्या ७२ धावा झालेल्या असताना गिल धावबाद झाला, तसेच नंतर संघाच्या ८५ धावा झालेल्या असताना वेडदेखील झेलबाद झाला. आघाडीचे हे दोन्ही फलंदाज तंबुत परतल्यामुळे गुजरात संघावर दबाव वाढला.

यानंतर हार्दिक पांड्या आणि डेव्हिड मिलर या जोडीने सावध पवित्रा घेत फलंदाजी केली. दोघांनीही अनुक्रमे नाबाद ५० आणि ५६ धावा केल्या. मिलरची खेळी राजस्थानसाठी संजिवनी ठरली. संघ दबावामध्ये असताना त्याने ३६ चेंडूंमध्ये तीन चौकार आणि तीन षटकार लगावत ५६ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी केली. प्रसिध कृष्णाने टाकलेल्या अखेरच्या षटकात मिलरने सलग तीन षटकार खेचले.

यापूर्वी गुजरात टायटन्स संघाने नाणेफेक जिंकून सुरुवातीला गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या राजस्थानची खराब सुरुवात झाली. संघाच्या ११ धावा झालेल्या असताना राजस्थानचा यशस्वी जैस्वाल अघव्या तीन धावा करून झेलबाद झाला. त्यानंतर मात्र दुसऱ्या विकेटसाठी आलेला संजू सॅमसन आणि जोस बटलर या जोडीने चांगली खेळी केली. बटलरने ५६ चेंडूंमध्ये १२ चौकार आणि दोन षटकार लगावत ८९ धावांची खेळी केली.

बटलरला संजू सॅमसनने साथ दिली. त्याने धडाकेबाज फलंदाजी करीत २६ चेंडूंमध्ये पाच चौकार व दोन षटकारांसह ४७ धावा केल्या. देवदत्त पडिक्कलने २० चेंडूंमध्ये २८ धावा केल्या. हे तीन फलंदाज वगळता राजस्थानचा एकही खेळाडू चांगली फलंदाजी करू शकला नाही.

पराभव झालेल्या राजस्थानला आणखी एक संधी असून हा संघ क्वॉलिफायर-२मध्ये २७ मे रोजी एलिमिनेटर सामन्यामधील विजेत्याशी दोन हात करेल.

## राष्ट्रीय शूटिंग स्पर्धेत नवी मुंबईच्या उत्तम माने यांना कांस्यपदक

**नवी मुंबई : बातमीदार**

चौथी राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धा नुकतीच केरळची राजधानी तिरूअनंतपुरम येथे झाली. या स्पर्धेत नवी मुंबईतील सानपाडा येथील रहिवासी उत्तम माने (वय ६७) यांनी ॲथलेटिक्स आणि रायफल शूटिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांना कांस्यपदक देऊन गौरविण्यात आले.

ज्येष्ठ नागरिक असलेले उत्तम माने हे विविध स्पर्धांमध्ये भाग घेत असतात. त्यांनी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले. त्याबद्दल त्याचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. माने हे सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघांचे सभासद आहेत. त्यांनी आतापर्यंत ॲथलेटिक्समध्ये राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक पदके जिंकली आहेत.





## रायगडचा हिंगोलीवर दणदणीत विजय

### आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेत क्रिश पाटील, नैतिक सोळंकी यांची शतके

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुणे येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील मुलांच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत पहिल्या साखळी सामन्यात रायगडने हिंगोलीवर एक डाव व १४२ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

हिंगोली संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल. रायगडने हिंगोलीचा डाव ४४.२ षटकांत १५७ धावांमध्ये गुंडाळला. त्यानंतर रायगडने आपला पहिला डाव ७३ षटकांत ८ बाद ४२४ या धावसंख्येवर घोषित केला. पहिल्या डावात २६७ धावांची भक्कम आघाडी घेऊन रायगडने हिंगोली संघाचा दुसरा डाव १२५ धावात गुंडाळला.

हिंगोलीच्या पहिल्या डावात निलय सावंत या फिरकी गोलंदाजाने भेदक गोलंदाजी करून ४.२ षटकात १३ धावा देत हॅट्ट्रिकसह चार बळी घेतले. राहुल सिंग या फिरकी गोलंदाजाने १२ षटकांत ३० धावांत तीन गडी बाद केले.

रायगडच्या पहिल्या डावात क्रिश पाटील व नैतिक सोळंकी याने शतक ठोकले. क्रिशने ९८ चेंडूंचा सामना करून १९ चौकार व दोन षटकारांसह १३२ धावांची खेळी केली, तर नैतिकने ११८ चेंडूंना सामोरे जात २३ चौकार व एक षटकारासह नाबाद १२४ धावा केल्या. अमेय पाटील (५७ धावा) व स्मित पाटील (३३ धावा) यांनी देखील चांगली फलंदाजी केली.

राहुल सिंग व ओम म्हात्रे (प्रत्येकी तीन बळी) यांनी भेदक गोलंदाजी करून हिंगोली संघाचा दुसरा डाव ३८.२ षटकात १२५ धावात संपवला. या सामन्यात दोन्ही डावांत मिळून राहुलने सहा बळी घेतले.

## चेसेबल मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत प्रज्ञानंद उपांत्य फेरीत

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने चीनच्या वे यीला २.५-१.५ असे नमवत चेसेबल मास्टर्स ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. १६ वर्षीय प्रज्ञानंदचा उपांत्य फेरीत अनिश गिरीशी (हॉलंड) सामना होईल.

प्रज्ञानंदने यीविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीतील सामन्याचा पहिला डाव ९० चालींमध्ये जिंकला. तसेच त्याने दुसऱ्या गेममध्येही बाजी मारत चार डावांच्या या लढतीत २-० अशी आघाडी मिळवली. त्यानंतर तिसऱ्या डावात यीने पुनरागमन करताना विजय नोंदवला. चौथा डाव बरोबरीत सुटल्याने प्रज्ञानंदला आगेकूच करण्यात यश आले.

## पोलीस अधिकारी सुभाष पुजारींची मिस्टर एशिया आणि मिस्टर वर्ल्ड शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : वार्ताहर**

येथील महामार्ग पोलीस दलातील सहाय्यक निरीक्षक सुभाष पुजारी यांची मिस्टर एशिया आणि मिस्टर वर्ल्ड या शरीरसौष्ठव स्पर्धांसाठी निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत असून अनेकांनी त्यांना आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.



भारतीय बॉडी बिल्डिंग फेडरेशन व हिमाचल प्रदेश बॉडीबिल्डिंग फेडरेशन यांच्या वतीने हिमाचल प्रदेशमधील पोवंटा साहिब या ठिकाणी भारतीय बॉडीबिल्डिंग संघ निवड चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये सुभाष पुजारी यांची ८० किलो वजनी गटात भारतीय संघात निवड करण्यात आली.

मिस्टर अशिया ही स्पर्धा मालदिव येथे १५ ते २१ जुलैदरम्यान होणार आहे, तर मिस्टर वर्ल्ड स्पर्धा थायलंड फुकेतया ठिकाणी ६ ते १२ डिसेंबरदरम्यान होणार आहे. या दोन्ही स्पर्धांसाठी सुभाष पुजारी हे दररोज पाच तास वन अबोव जिम नेरूळ व वाशी येथे आंतरराष्ट्रीय खेळाडू मिस्टर युनिव्हर्स सुनित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत.

पुजारी यांना वर्ल्ड बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी चेतन पाठारे, लिगल ॲडव्हायझर विक्रम रोठे वर्ल्ड यांचे मार्गदर्शन लाभले. या निवडीबद्दल त्यांचे पोलीस महासंचालक हेमंत नगराळे, डॉ. भूषणकुमार उपाध्याय, अप्पर महासंचालक विनय कारगावकर, अनुपकुमार सिंह, नवी मुंबई अप्पर पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, महामार्ग (पुणे) पोलीस अधीक्षक संजय जाधव, पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह पोलीस खात्यातील त्यांचे सहकारी, मित्र तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## सुपरबेट पोलंड बुद्धिबळ स्पर्धा आनंद संयुक्तरीत्या दुसऱ्या स्थानी

**वॉरसॉ : वृत्तसंस्था**

भारताचा पाच वेळा विश्वविजेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदने सुपरबेट जलद (रॅपिड) आणि अतिजलद (ब्लिट्झ) पोलंड बुद्धिबळ स्पर्धेत संयुक्तरीत्या दुसरे स्थान मिळवले. ५२ वर्षीय आनंदने अतिजलद विभागात सोमवारी तीन विजयांची नोंद केली.

आनंदने २७व्या आणि अखेरच्या फेरीत रादोस्लाव्ह वोस्ताजेकला (पोलंड) पराभूत केले तसेच त्याने रिचर्ड रॅपपोर्ट (हंगेरी) आणि किरिल शिव्हचेंको (युक्रेन) यांच्यावरही मात केली, मात्र त्याला तीन सामन्यांत बरोबरीवर समाधान मानावे लागले आणि त्याने तीन सामने गमावले. त्यामुळे या स्पर्धेच्या जेतेपदापासून त्याला वंचित राहावे लागले.

## ४० प्लस कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राला दुहेरी विजेतेपद



(छाया : संतोष पेरणे)

### पुरुष संघाच्या कर्णधाराची नेरळमध्ये मिरवणूक

**कर्जत : बातमीदार**

केरळमध्ये चौथ्या मास्टर गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या महिला आणि पुरुष या दोन्ही संघांनी विजेतेपद पटकाविले. यातील पुरुष संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकाविले असून या संघाचा कर्णधार अनिल जैन यांचे नेरळमध्ये मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.

चौथी मास्टर गेम्स स्पर्धा केरळची राजधानी तिरुवनंतपुरम येथे नुकतीच झाली. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून कबड्डीचे तीन संघ सहभागी झाले होते. ४० प्लस गटात महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघाने अंतिम विजेतेपद मिळवून सुवर्णपदक मिळविले. यातील पुरुष संघाचे नेतृत्व रायगड जिल्ह्यातील नेरळ येथील अनिल जैन यांनी केले.

मास्टर्स स्पर्धेचे विजेतेपद पटकाविणाऱ्या महाराष्ट्र संघाचे कर्णधार अनिल जैन नेरळमध्ये आले असता ग्रामस्थ तसेच जैन सकल संघ यांनी त्यांची गावाच्या वेशीवरून मिरवणूक काढली. नेरळ बाजारपेठत बँडच्या तालावर निघालेल्या या मिरवणुकीत अनेक लोक सहभागी झाले होते. त्यांनी जैन यांचे अभिनंदन केले.

## फ्रेंच ओपन : जोकोव्हिच, मेदवेदेवची विजयी सलामी

**पॅरिस : वृत्तसंस्था**

जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिचने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत विजयी सलामी दिली. पुरुष एकेरीत त्याच्यासह दुसऱ्या मानांकित डॅनिल मेदवेदेवलाही आगेकूच करण्यात यश आले. युवा व्होल्गर रूनने १४व्या मानांकित डेनिस शापोव्हालोव्हला पराभवाचा धक्का दिला. महिलांत कॅरोलिना प्लिस्कोव्हा, अलाइज कॉर्ने व डॅनिएले कॉलिन्स यांनी विजयासह दुसरी फेरी गाठली.

गतविजेत्या जोकोव्हिचने पहिल्या फेरीच्या लढतीत जपानच्या बिगरमानांकित योशिहितो निशिओकावर ६-३, ६-१, ६-० असा सहज विजय मिळवला. अन्य एकेरीच्या सामन्यात मेदवेदेवने अर्जेंटिनाच्या फाकुंडो बाग्निसला ६-२, ६-२, ६-२ असे पराभूत केले. डेन्मार्कच्या रूनने शापोव्हालोव्हला ६-३, ६-१, ७-६ असे सरळ सेटमध्ये नमवत धक्कादायक निकालाची नोंद केली. सातव्या मानांकित आंद्रे रूब्लेव्हने कोरियाच्या क्वॉन सून-वूला ६-७ (५-७), ६-३, ६-२, ६-४ असे नमवत दुसरी फेरी गाठली.

महिलांमध्ये चेक प्रजासत्ताकच्या प्लिस्कोव्हाने फ्रान्सच्या तेसावर २-६, ६-३, ६-१ अशी मात केली. फ्रान्सच्या कॉर्नेने जपानच्या मिसाकी डोईला ६-२, ६-० असे सरळ सेटमध्ये पराभूत केले, तर अमेरिकेच्या नवव्या मानांकित कॉलिन्सने बल्गेरियाच्या व्हिक्टोरिया तोमोव्हाचे आव्हान ६-०, ६-४ असे परतवून लावले.

### बोपण्णा-मिडलकूप दुसऱ्या फेरीत

भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा सहकारी मात्वे मिडलकूप यांनी फ्रान्सच्या लुका व्हॅन आस्चे आणि साशा वेनबर्ग जोडीवर ६-४, ६-१ अशी मात करीत पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत धडक मारली आहे.

## व्हेलॉसिटीचा सुपरनोव्हाजवर विजय; मायाची अनोखी शैली



महिला टी-२० चॅलेंज

**पुणे : प्रतिनिधी**

एकीकडे आयपीएलचे प्लेऑफचे सामने खेळवले जात आहेत, तर दुसरीकडे पुण्यात महिला टी-२० चॅलेंज स्पर्धेचा थरार रंगला आहे. सुपरनोव्हाज आणि व्हेलॉसिटी या दोन संघामध्ये टी-२० चॅलेंजमधील दुसरा सामना मंगळवारी खेळवला गेला. या सामन्यात व्हेलॉसिटी संघाचा सात गडी राखून विजय झाला. या संघात मूळची महाराष्ट्राची असलेली फिरकीपटू माया सोनवणेची गोलंदाजी करण्याची पद्धत चर्चेचा विषय ठरला आहे.

सामन्यात व्हेलॉसिटी संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सुपरनोव्हाज संघाने २० षटकांत १५० धावा केल्या. व्हेलॉसिटी संघाने ही धावसंख्या १९व्या षटकात गाठत सामन्यावर आपले नाव कोरले.

व्हेलॉसिटी संघाकडून खेळताना माया सोनवणे या खेळाडूने एकूण दोन षटके टाकली. तिला बळी घेता आले नाही, पण तिच्या अनोख्या गोलंदाजीची अनेकांनी प्रशंसा केली आहे. चेंडू टाकताना माया पूर्ण खाली वाकते तसेच चेंडू टाकताना तिचे लक्ष फलंदाजाकडे नसते. याच खास शैलीमुळे अनेक जण प्रभावित झालेत.




सौजन्य : अनिल कोकाटे


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com